# बिसेन डेन्टल केअर



डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ४५ | बुधवार,दि.१८ ऑक्टोबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## कॉलम व पाया शिवाय भिंतीचे बांधकाम; कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह





**देवरी:–** ग्रामीण रुग्णालयाच्या नवनिर्मित इमारतीच्या लोकार्पणाला घेवून देवरीतील विद्यमान आमदार सहेसराम कोरेटी आणि माजी आमदार संजय पुराम यांच्यात श्रेयवाद चांगलाच चव्हाट्यावर आला होता. दरम्यान, प्रशासनाने क्षुल्लक, किरकोळ कामे पूर्ण केल्यानंतर इमारतीचे लोकार्पण करण्यात येईल. त्यानुरुप सुरक्षा भिंतीचे बांधकाम सुरू करण्यात आले. मात्र, अभियंताच्या अजब तंत्रज्ञानातून कॉलम व पाया शिवाय भिंतीचे बांधकाम केले जात आहे. त्यामुळे कामाच्या दर्जावर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहेत.तर दुसरीकडे हे दर्जेदार काम उघडपणे होत असले तर श्रेयवादासाठी समोर येणारे जनप्रतिनिधी (आजी व माजी आमदार) दिसून येत नाही, त्यामुळे निकृष्ठ बांधकामातून होणाऱ्या भ्रष्टाचाराला श्रेय लाटण्यासाठी पुढे येणाऱ्यांची मुकसम्मती तर नाही, अशी प्रतिक्रियाही सर्वसामान्यां कडून उमटू लागली आहे. शासकीय काम म्हटले की,त्यात भ्रष्टाचार ही बाब अग्रस्थानी असते. याची प्रचीती ही देवरी येथील नवनिर्मित ग्रामीण रुग्णालय इमारतीचे बांधकाम देत आहे.ग्रामीण रुग्णालयासाठी इमारतीचे बांधकाम करण्यात आले.मात्र ते बांधकाम गेल्या तीन वर्षापासून अद्यापपर्यंत पुर्णत्वास आले नाही. तर दुसरीकडे जिर्ण इमारतीतच ग्रामीण रुग्णालयाची सेवा दिली जात आहे. यामुळे जनप्रतिनिधींमध्ये इमारत लोकार्पणाला घेवून श्रेयवाद सुरू झाला.

विद्यमान आमदारांनी इमारतीचे लोकार्पण केले. तर माजी आमदार संजय पुराम ने विद्यमान आमदाराच्या या लोकार्पणाला श्रेय लाटण्याचा प्रकार म्हणून समोर केला. दरम्यान चांगलाच श्रेयवाद चव्हाट्यावर आला होता. जनप्रतिनिधीच्या या श्रेयवादात प्रशासनाने उडी घेतली. इमारतीचे किरकोळ कामे त्वरित पुर्ण करुन लोकार्पण करण्याचे आश्वासन दिले. त्यानुरुप इमारत परिसरातील किरकोळ कामे शुरू करण्यात आली. मात्र शासकीय कामे कसे दर्जाहीन केले जातात, याचे परिचय उघडपणे यंत्रणेकडून सुरक्षा भिंतीच्या बांधकामावरुन दिले जात आहे. सुरक्षा भिंत विना कॉलम व बिना पाया ने उभी केली जात आहे. त्यामुळे अभियंताचा अजब तंत्रज्ञान देवरी तालुक्यात चांगलाच चर्चेत आला आहे. दर्जाहीन सुरू असलेल्या सुरक्षा भिंतीच्या बांधकामकडे श्रेयवादात उडी घेणार, ते आजी व माजी कुठे गेले ? असा प्रश्नही आता जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

## वाघांची शिकार, बावरीया टोळीच्या आणखी पाच जणांना अटक



**गडचिरोली :** बावरीया टोळीने सावली तालुक्यातील राजोली फाल येथे दोन वाघांची शिकार केल्याप्रकरणी वनविभागाने सोमवारी गुवाहाटी येथून बावरीया टोळीच्या आणखी पाच आरोपींना अटक केली आहे. राजवंती बावरिया, मायावती बावरिया, रामदास बावरिया, अर्जुन सिंग बावरिया, प्रकाश बावरिया अशी अटकेतील आरोपींची नावे असून यात दोन महिलांचाही समावेश आहे. वाघाच्या शिकारप्रकरणी आरोपींची संख्या आठ वर पोहोचली असून आणखी संशयितांची नावे समोर आल्याने आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

गडचिरोली येथे शिकार केलेल्या वाघाचे कातडे गुवाहाटी येथे वनविभागाने जप्त केले होते. वनविभागाने गुवाहाटी येथून तीन आरोपींना अटक करून चौकशीसाठी गडचिरोलीत आणले होते. दरम्यान आरोपींची अधिक चौकशी केली असता, सावली वनापरिक्षेत्रातील राजोली फालमध्ये दोन वाघांची शिकार केल्याची माहिती आरोपींनी वनविभागाला दिली. त्यामुळे सावली वनविभागाला आरोपींची चौकशी करणे आवश्यक होते. मात्र, आरोपी गडचिरोली वन विभागाच्या ताब्यात होते. त्यांची चौकशी झाल्यानंतर जिल्हा कारागृह चंद्रपूरला रवानगी करण्यात आल्यानंतर तीनही आरोपींचा ताबा मिळावा यासाठी सावली वनविभागाने न्यायालयात अर्ज दाखल केला होता.

सावली न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर बावरिया रुमाल सिंग प्रभू सिंग बावरिया, राजू सिंग गोपी सिंग बावरीया, सोनू सिंग रणजीत सिंग बावरिया या तीनही आरोपींना सावली वनविभागाने ताब्यात घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपींना तीन दिवसांची वन कोठडी ठोठावली. वनकोठडी ठोठावण्यात आल्यानंतर वनविभागाच्या पथकाकडून आरोपींना मौका चौकशी करण्यासाठी राजोली फाल येथील घटनास्थळावर नेण्यात आले. यावेळी आरोपींनी काही संशयित आरोपींची माहिती वन विभाग दिली. त्यानुसार वनविभागाने पुन्हा गुहावाटी गाठून बावरीया टोळीच्या ५ आरोपींना अटक केली आहे. या पाचही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असून त्यांना वन कोठडी ठोठावण्यात आली आहे. राजोली फाल येथील दोन वाघांच्या शिकार प्रकरणी एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. याप्रकरणात आरोपींना सहकार्य करणा?या संशयित आरोपींची नावेसुध्दा बावरीया टोळीने वनविभागाला दिली आहे. त्यामुळे आरोपींची संख्या वाढण्याची दाट शक्यता आहे. घटनेचा अधिक तपास सहायक वनसंरक्षक आदेश कुमार शेंडगे यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्राधिकारी जी. आर. नायगमकर व वनविभागाचा चमू तपास करीत आहे.

## बांधकामाची माहिती दर्शविणाऱ्या अपुर्ण फलकांचा विभागाच्या सगंनमताने भरणा





**गोंदिया:–** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागार्तगत येत असलेल्या उपविभागातील गावामंध्ये विविध योजनेतंर्गत सिमेंटरस्ता,नाली बांधकाम,सभागृह,शाळा वर्गखोली,चावडी तसेच मनरेगा अंतर्गतच्या कामाच्या ठिकाणी ज्या योजनेंतर्गत काम करण्यात येत आहे,त्याचे फलक पहिल्या दिवसापासूनच लावणे बंधनकारक असते.तसेच काम पुर्ण झाल्याच्या दिवशी काम पुर्ण झाल्याचा उल्लेख त्या फलकावर करणेही बंधनकारक असून त्या फलकाचे छायाचित्र देयकासोबत लावावे लागतात.मात्र गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात अपुर्ण माहिती असलेल्या फलकाचे छायाचित्र लावून देयके काढले जात असल्याचे चित्र समोर आले आहे.

यासंदर्भात गोंदिया तालुक्यातील विविध गावामध्ये सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी भेटी दिल्यावर त्या फलकावर काम सुरु झाल्याचे व काम पुर्ण झाल्याच्या तारखेचा उल्लेखच नसल्याचे बघावयास मिळाले.या फलकाच्या मुद्यालाच घेऊन तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शितल फुंड यांनी कोरोना काळात जिल्ह्यातील विविध ठिकाणी भेटी दिले असता फलकच गायब असल्याचे समोर आले होते.त्यामुळे त्यांनी सदर कामाचे देयके व देयके निघालेल्या कामाच्या चौकशीला हात लावण्यास सुरवात करताच कंत्राटदारांनी फलक लावायाला सुरवात केली होती.

मात्र काही काळानंतर श्रीमती फुंड मॅडमही शांत झाल्या आणि कंत्राटदारानी पुन्हा आपला पुर्वीसारखेच काम सुरु ठेवल्याने या विभागावर अधिकाऱ्याचे तर नियंत्रण नाहीच पण बांधकाम सभापतीचे सुध्दा नियंत्रण राहिलेले नाही,हे वास्तव नाकारता येत नाही.जिल्हा परिषदेच्या विविध योजनेच्या कामातील फलक गायब होण्याचेही प्रमाण मोठे असून हा सुध्दा मोठा भ्रष्टाचारच म्हणण्याची वेळ आली आहे.अभियंत्यांना विविध प्रकारचे काम सोपवून ताण दिल्यामुळे ते इमानेइतबारे कुठल्याही कामाकडे व्यवस्थित लक्ष देऊ शकत नाही.

अशापरिस्थितीतही कार्यकारी अभियंता व उपअभियंत्याने गावापर्यंत अभियंता पोचेल असे नियोजन करण्याची गरज असतांना हे दोन्ही वरिष्ठ अधिकारी विभागाचे सभापती व जिल्हा परिषद अध्यक्षांची मर्जी सांभाळत त्यांच्या कंत्राटदारांनाच खुश करण्यात मशगुल झाल्याने जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील या फलक घोटाळ्याकडे दुर्लक्ष झाले आहे.तर मुख्यालय सांभाळणाऱ्या अभियंत्याला काही कामाचे अधिकार नसतांनाही मुख्यालयाचे सर्व अधिकार कसे दिले गेले हा सुध्दा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.




## धान खरेदीकरीता शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरु

**गोंदिया :** शासकीय आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम २०२३-२४ मधील धान खरेदीकरीता छ्एचङ पोर्टलवर शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरु झालेली आहे. शेतकऱ्यांनी नोंदणी करतांना प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. शेतकरी नोंदणी करतांना हंगाम २०२३-२४ पासुन ज्या शेतकऱ्यांचा ७/१२ उतारा आहे त्याच शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करणे आवश्यक आहे, त्याशिवाय नोंदणी पूर्ण होणार नाही. ज्या शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावयाची आहे त्याच शेतकऱ्यांनी लाईव्ह फोटो अपलोड करण्यासाठी स्वत: खरेदी केंद्रावर उपस्थित राहून दिलेल्या कालावधीत म्हणजेच १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२३ पर्यत खरेदी केंद्रावर मुदतीत धान विक्रीसाठी नोंदणी पूर्ण करावीत.

नोंदणीसाठी मंजुर खरेदी संस्थांची यादी पुढीलप्रमाणे आहे. गोंदिया, खातीया (परसवाडा), मुंडीपार (चखऊ), कामठा, गणखैरा, गोरेगाव, कालिमाटी (गोरेगाव), सर्वाटोला, गोंदेखारी, नवेझरी, विहिरगाव, वडेगाव, आमगाव, गोरठा, कालिमाटी (आमगाव), अंजोरा, कट्टीपार, सुपलीपार, वळद, तिगाव, हरदोली, पांढरी, कोटजांभोरा, सौंदड, अर्जुनी/मोरगाव (लक्ष्मी), नवेगावबांध, अर्जुनी/मोरगाव (ख.वि.), बाकटी, बोंडगाव देवी, धाबेटेकडी, महागाव, वडेगाव रेल्वे इत्यादी मंजुर आधारभुत धान खरेदी केंद्रावर खरीप पणन हंगाम २०२३-२४ मधील ७/१२ उतारा, पीक पेरा असलेला, आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नंबर इत्यादी कागदपत्र सोबत घेऊन जाऊन आपली नोंदणी करण्याचे आवाहन केले.

## ऑनलाइन जुगार प्रकरणातील बुकी सोंटू जैनचे न्यायालयात आत्मसमर्पण



**नागपूर:** ऑनलाइन जुगाराच्या नादी लावून व्यापारी विक्रांत अग्रवाल यांची ५८ कोटींनी फसवणूक करणारा बुकी आणि ठकबाज अनंत ऊर्फ सोंटू जैन रा.गोंदिया याने सोमवारी दुपारी न्यायालयात आत्मसमर्पण केले. न्यायालयीन आदेशानंतर गुन्हेशाखा पोलिसांनी सोंटूला अटक करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. डायमंड एक्सचेंज डॉट कॉम या ऑनलाइन जुगार साइटच्या आधारे सोंटूने अग्रवाल यांची फसवणूक केली.

अग्रवाल यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच सोंटू दुबईला पसार झाला. २२ जुलैला पोलिसांनी सोंटूच्या गोंदियातील निवासस्थानी छापा टाकला. निवासस्थानाहून पोलिसांनी १७ कोटींची रोख, १४ किलो सोने व २९४ किलो चांदी जप्त केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या चार बँक लॉकरची झडती घेतली. लॉकरमधूनही पोलिसांनी ८५ लाख व साडेचार कोटींचे सोने जप्त केले. सत्र न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर सोंटूने वकिलामार्फत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतला.

उच्च न्यायालयानेही त्याचा जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर सोंटूने सर्वोच्च न्यायालयान जामिनासाठी अर्ज दाखल केला. ९ ऑक्टोबरला सर्वोच्च न्यायालयानेही त्याचा जामीन फेटाळत सात दिवसांत आत्मसमर्पण करण्याचे निर्देश दिले. सोमवारी मुदत संपल्याने सोंटूने वकिलामार्फत प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात आत्मसमर्पण केले. कुख्यात दाऊद टोळीचा सदस्य व डायमंड एक्सचेंज डॉट कॉम या ऑनलाइन जुगार साइटचा सूत्रधार नईम ऊर्फ नदीम याच्यापर्यंत हे ऑनलाइन जुगाराचे रॅकेट चालते. भारतात ऑनलाइन जुगाराची जबाबदारी बुकी राकेश राजकोट ऊर्फ आरआर याच्याकडे आहेत. आरआरही पोलिसांना हवा आहे. सोंटूच्या अटकेनंतर पोलिस या ऑनलाइन जुगाराचे पाळेमुळे शोधणार आहे.

# आरक्षण संपवण्याचा राज्यकर्त्यांचा डाव

## विदर्भातील ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींच्या सभेत वडेट्टीवार यांचा आरोप




**नागपूर :** आरक्षण संपुष्टात आणणे आणि ओबीसींना वार्यावर सोडण्याचा राज्यकर्त्यांचा डाव असल्याचा आरोप विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी केला. ओबीसींना कुणीही लक्ष्य केल्यावर त्यांच्यावर तुटून पडा असे आवाहन ही त्यांनी केले.

विदर्भातील ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींची विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत सोमवारी रवीभवनात बैठक झाली. या बैठकीत येत्या २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनी नागपूरात ओबीसींचा मोर्चा आणि जाहीर सभा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आरक्षण संपवण्याचा डाव उधळून लावणे,सरकारी नोकरीच्या कंत्राटीकरणास विरोध,तसेच विदर्भातील सर्व ओबीसी संघटनांना एकत्र आणून कृती समिती तयार करणे,आगामी काळातील रणनीती कशी राहील, काय करावे, आदी मुद्यांवर बैठकीत चर्चा झाली. विविध संघटनांच्या प्रतिनिधींची समन्यव समिती स्थापन करण्यात येणार आहे.प्रत्येक जिल्ह्याला प्रतिनिधीत्व देत २१ सदस्य त्यात असावेत अशी सूचनाही वडेट्टीवार यांनी केली.या लढ्याला नवे नाव देऊन नव्याने प्रारंभ करावा, समाजातून जरांगे तयार करा, ओबीसींना कुणीही लक्ष्य केल्यास प्रखर विरोध करा, बदनामी करण्याचा प्रश्न केल्यास त्यास ठोस प्रत्युत्तर देऊ, असा इशाराही वडेट्टीवार यांनी दिला.

ओबीसींवर अन्याय होणार नाही अणि आरक्षणात कुणीही वाटेकरी होणार नाही,यासाठी जाहीर सभा घेण्याचा निर्णय झाला.या चळवळीत सर्वतोपरी मागे अदृश्य शक्ती आहे.श्रीमंत मराठा समाज जरांगेच्या पाठिशी आहे. ओबीसींबाबत मात्र राज्यकर्ते गंभीर नाही.मुंबईत बैठकीचा फार्स रंगवला, असा आरोपही वडेट्टीवारांनी केला.

मनोज जरांगे यांना मात देण्यासाठी ओबीसी संघटनातील लोकांनी व नेत्यांनी आपल्या नेत्याचा उदोउदो,जयघोष न करता,व्यक्तिनिष्ठा बाजूला ठेवून सर्वांनी काम केले पाहिजे असे आमदार ॲड. अभिजीत वंजारी म्हणाले.संविधानिक हक्क अधिकाराच्या लढ्यासाठी मतभेत विसरुण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे विचार राष्ट्रीय ओबीसी बहुजन महासंघाचे अध्यक्ष डॉ.खुशाल बोपचे यांनी व्यक्त केले.त्याचप्रमाणे सर्वसमावेशक सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना आमंत्रीत करावे, कोण किती सहकार्य करतात, हे महत्वाचे आहे.जे आले ते आपले, कुणाचाही जयघोष न करता जय ओबीसी अशी घोषणा द्यावे असे ओबीसी महासंघाचे डॉ. बबन तायवाडे यानी सांगितले.यावेळी बहुजन संघर्ष समितीचे नागेश चौधरी यांनी जरांगेच्या मागे विचारशक्ती आहे,त्या विचारशक्तीच्या बळावर त्यांचे आंदोलन सुरु आहे.मात्र ओबीसी संघटनांच्या मागे विचारशक्तीचा अभाव असल्याने आपण विभागले गेलो आहोत,आपणासह विचारशक्तीचा वापर करुन आंदोलन बळकट करावे लागेल असे विचार व्यक्त केले.बळीराज धोटे यांनी २६ नोव्हेबरला आयोजित मोर्च्याची माहिती दिली.अंजली साळवे यांनी जनगणनेकरीता न्यायलयीन लढाईची गरज असल्याचे सांगत संसदेत आपला आवाज पोचला पाहिजे असे म्हणाल्या.सदानंद इलमे यांनी ओबीसी आंदोलनाला राजकीय नेत्यांनी पाठिंबा द्यावा मात्र मंचावर स्थान मिळेल याची अपेक्षा न ठेवल्यास सामाजिक आंदोलनाला महत्व मिळेल असे विचार मांडले.

मनो जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी सरकारला ८ दिवसांचा अवधी दिला आहे, त्यामुळे ओबीसी समाज संतप्त असून नागपुरात विदर्भातील विविध ओबीसी संघटनांची बैठक घेण्यात आली.

बैठकीत जरांगे यांनी जाहीर सभेत ५० टक्क्यांच्या मर्यादेत मराठा समाजाला आरक्षण हवे असल्याचे म्हटले.त्यासह ओबीसी समाजाच्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करत सरकारकडून प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यासाठीची रणनितीचा भाग म्हणून येत्या २६ नोव्हेंबरला नागपूरात आंदोलन करण्यावर चर्चा करण्यात आली.सोबतच विदर्भातील सर्व संघटनांना एकत्र आणून ओबीसी समन्वय कृती समिती तयार करण्याचा निर्णय विरोधी पक्ष नेते विजय वड्डेटीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेतला गेला.

या बैठकीत ओबीसी जनमोर्च्याचे प्रा.रमेश पिसे, प्रा.जावेद पाशा, ब?ीराज धोटे, पाटी लावा अभियानाच्या एड.अंजली साळवे,अवंतिका लेकुरवाडे, ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे, अशोक लंजे, कैलास भेलावे, महात्मा समता फुले परिषदेचे प्रा.दिवाकर गमे, ओबीसी युवा अधिकार मंचचे पियुष आकरे,कृतल आकरे, ओबीसी सेवा संघाचे भैय्याजी लांबट,ओबीसी क्रांती मोर्चायचे मते, सुनिल पाल, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे शेषराव येलेकर,शकील पटेल,सुषमा भड, प्रकाश साबळे,प्रमोद मुन, पांडुरंग काकडे, बहुजन सौरभच्या संपादिका संध्या राजुरकर, विवेक खुटेमाटे,




गोविंद वरवाडे, डॉ सिध्दार्थ कांबळे, सुर्यकांत खनके,यांच्यासह नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, राजुरा, ब्रम्हपूरी, वाशीमसह संपूर्ण राज्यभरात ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटनांचे नेते आणि कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

## ६५ केंद्रांचा कारभार वाऱ्यावर; केंद्र प्रमुखांचा सामूहिक राजीनामा

**गोंदिया:** केंद्र प्रमुखांची पदे पदोन्तीने भरण्याच्या मागणीला घेवून केंद्र प्रमुख पदाच प्रभार असलेल्या जिल्ह्यातील ६५ शिक्षकांनी प्रभाराच राजीनामा ३ ऑक्टोबर रोजी दिला. त्या रिक्त पडलेल्या पदावर अद्याप कुणाची नियुक्तीच करण्याय आली नाही. त्यामुळे शाळांचा प्रशासकीय कारभार वाऱ्यावर आहे. स्वत:हून शिक्षक संघटनांनी शिक्षणाधिकारी यांची भेट घेतली. मात्र शिक्षणाधिकारी यांनी अद्यापही त्यावर तोडगा काढला नसल्याने शिक्षणाची जिल्ह्यात वरार निघाल्याचाच प्रकार सुरु आहे.

गेल्या काही वर्षापासून जिल्ह्यात शिक्षणाची वाट लागली. प्रभारांवर जिल्ह्यातील शिक्षणाची धुरा आहे. प्रभार देताना जिल्हैा देखील कुणाला द्यावे यांच्या निकषांकडे दुर्लक्ष करुन आणि पात्र व्यक्ती असताना देखील मर्जीतील अपात्र व्यक्तींना प्रभार सोपविण्याचा प्रकार गेल्या काही वर्षापासून सुरु आहे. त्यासंदर्भात वारंवार आवाज देखील उचलण्यात आला. मात्र बॉस ईज आलवेज राईट या म्हणीप्रमाणे कसलाही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे आहे तोच किता आताही गौरविण्यात येत आहे. जिल्ह्यात केंद्र प्रमुखांची ८८ पदे मंजूर आहेत. त्यातील १८ पदे भरलेली आहेत. मात्र तब्बल ७० पदे रिक्त आहेत. २०१२ पासून शिक्षकांची पदोन्नती करण्यात आली नसल्यामुळे रिक्त पदांची संख्या वाढत चालली आहे. केंद्र प्रमुखावर समूह साधन केंद्र अर्थात त्या केंद्रात येणाऱ्या शाळांमधील प्रशासकीय कारभार बघण्याची जवाबदारी असते. केंद्रप्रमुख हे पद जवाबदारीचे आहे. मात्र जिल्ह्यातील ७० रिक्तपदांचा प्रभार गुरुज़ीकडे सोपविण्यात आला. परिणामी त्या शिक्षकांकडे असलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. वारंवार शिक्षक संघटनांनी शिक्षणाधिकारी ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले. मात्र कुणीही त्याकडे लक्ष दिले नाही. २ ऑक्टोबर रोजी शिक्षकांच्या सर्व संघटनांनी मिळून आक्रोश मोर्चा काढला. त्या मोर्चात केंद्रप्रमुख पदाच्या प्रभाराचा सामूहिक राजीनामा देण्याचा निर्णय घेण्यात आला. निर्णयानुसार ३ ऑक्टोबर रोजी ७० पैकी ६५ केंद्रप्रमुखांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे १२ दिवसांपासून केंद्रस्तरावरील शिक्षणाची प्रशासकीय घडी विस्कटली आहे. अत्यंत ज्वलनशील विषय असून देखील त्याकडे अद्यापही गांभीर्याने लक्ष देण्यात आले नसल्याने शिक्षण विभागात नेकमे चालले तरी काय? असे म्हण्याची वेळ आली आहे. यासंदर्भात शिक्षणाधिकारी महेंद्र गजभिये यांच्याशी भ्रमणध्वनीवत संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### अशा आहेत मागण्या

**जिल्ह्यातील प्रभारी केंद्रप्रमुखांनी सामूहिक राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यात आम्हाला अशैक्षणिक कामे न देता विद्यार्थ्यांना शिकवू द्यावे. मागील ११ वर्षापासून रखडलेली उच्चश्रेणी मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती देण्यात यावी, घरभाडे कपातीचा निर्णय मागे घेऊन फक्त दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. घरभाडे भत्यासह वेतन बिल स्विकारुन वेतन द्यावे, चार वर्षापासून प्रलंबित चटोपाध्याय व निवडश्रेणी प्रकरणे निकाली काढावी. बीलओसारखी अशैक्षणिक कामे बंद करावी.**

### इतर जिल्ह्यात प्रक्रिया, गोंदियात नाही

**केंद्र प्रमुख पदाचा राजीनामा केवळ गोंदिया जिल्ह्यातच नाही, तर संपूर्ण राज्यात घेण्यात आला. राज्यातील इतर जिल्ह्यांनी प्रशासकीय घडी नीट राहावी. याकरिता शिक्षकांच्या मागण्यांवर विचार करुन प्रक्रिया देखील सुरू केली आहे. मात्र गोंदिया जिल्ह्यात अद्यापही कारभार वाऱ्यावरच आहे. केवळ गोलमोल उत्तरे देऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप शिक्षकांकडून होत आहे.**



**किती केंद्रप्रमुखांचा राजीनामा**

| | | |
|---|---|---|
| गोंदिया | १० पैकी | ९ |
| गोरेगाव | ५ पैकी | ५ |
| आमगाव | ६ पैकी | ६ |
| सालेकसा | १० पैकी | ९ |
| देवरी | ११ पैकी | ११ |
| सडक अर्जुनी | ६ पैकी | ६ |
| अर्जुनी मोरगाव | १४ पैकी | ११ |
| तिरोडा | ८ पैकी | ८ |

## संपादकीय

### शाळांचे खासगीकरण गुलामगिरीकडे नेणारे ठरेल

"शिंदे–फडणवीस–अजित पवार सरकार'ने राज्यातील जिल्हा परिषदांच्या ६२ हजार ७८३ शाळा "दत्तक शाळा योजने'च्या माध्यमातून खासगीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. "शिक्षण हक्क कायद्या'ला (राइट टु एज्युकेशन ॲक्ट– आरटीई) १३ वर्षे होऊनही, गेल्या सुमारे आठ वर्षांत या कायद्याला अभिप्रेत असलेली अंमलबजावणी थांबली आहे. आता तर ग्रामीण भागातील शाळा बंद करुन या बंद करण्यात आलेल्या शाळांचे खासगीकरण करून शाहू, फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रात मनुवादी–विषमतावादी विचारसरणी रुजविण्यासाठी सरकार कामाला लागले आहे.

कंगनासारख्या वादग्रस्त अभिनेत्रीला राज्य शासनाचे २० अंगरक्षक मिळू शकतात, मात्र देशाच्या संविधानात गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा अधिकार असूनदेखील २० गरीब विद्यार्थ्यांना एक शिक्षक शासन देऊ शकत नाही, ही संविधानाची अवहेलना असून माणूसकी हद्दपार झाल्याचे हे लक्षण आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून आपण पाहतो की, शिक्षण क्षेत्रात खासगीकरणाचा शिरकाव झाल्यामुळे अनेक समस्या उभ्या राहताना दिसत आहेत. महाराष्ट्र सराकरने खासगीकरणचा जणू काही सपाटाच लावल्याचे चित्र गेल्या काही महिन्यांत दिसू लागले आहे. राज्यात ६२ हजार सरकारी शाळा आहेत. या शाळा खासगी कंपनी व संस्थांना दत्तक देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाला "सकारात्मक प्रस्ताव' मुख्यमंत्र्यांकडून मिळाला आहे. म्हणजे थोडक्यात, या सरकारी शाळा खासगी कंपन्यांच्या ताब्यात देण्यात येणार आहेत.

या खासगी कंपन्या व संस्था आपल्या "सीएसआर निधी'चा वापर करून या शाळांचा विकास करतील असे सरकारचे म्हणणे आहे. "सीएसआर' म्हणजे कंपन्यांचे "सामाजिक उत्तरदायित्व' मात्र हे उत्तरदायित्व निभावण्याच्या नावाखाली या कंपन्यांना आपल्या आवडीनुसार शाळांच्या नावापुढे आपले नावही देता येणार आहे. तसा शासन निर्णय मंत्रालयातील शालेय शिक्षण व क्रीडा विभागातून १८ सप्टेंबर रोजीच निघाला, त्यानुसार मोक्याच्या ठिकाणी असलेल्या शाळा ताब्यात घेण्यासाठी अधिक दाम मोजावा लागणार तर कमी महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या शाळा अल्पमोलात, असा प्रकार दिसून येतो. उदाहरणार्थ, "अ' व "ब' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शाळांना दत्तक घेण्यासाठी व आपल्या सोयीचे नाव या शाळांना देण्यासाठी पाच वर्षांकरिता दोन कोटी व १० वर्षांकरिता तीन कोटी रुपयांची देणगी द्यावी लागणार असून "क' वर्ग महापालिकांसाठी पाच वर्षांकरिता एक कोटी व १० वर्षांकरिता दोन कोटी असा शिंदे, फडणवीस सरकारने या शाळांचा बाजार मांडलेला आहे.

हा निर्णय सरकारने घेतला जरी असला तरी यात अनेक तरुणांच्या नोकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर येणार आहे. सरकारने शाळांच्या बाजारीकरणाला गती दिल्यामुळे यापुढे या शाळांमधील शिक्षणाचेही बाजारीकरण "गतिमान, वेगवान" होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे जे सरकारी शिक्षक आहेत त्यांनाही कमी पगारावर शिकवावे लागेल आणि नवीन शिक्षक भरती जर केली तर त्यांनाही कमी पगारात काम करावे लागेल.

सहा ते चौदा वयोगटातील मुलामुलींना त्यांच्या घराजवळ शाळा देण्याचा कायदा असताना, याच सरकारच्या धोरणांमुळे मात्र विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना तोंड देत लांबच्या शाळेत जावे लागेल. कारण कमी पटसंख्येच्या शाळा बंद होतील. राज्यात अशा शाळांची संख्या १५ हजारांच्या आसपास असून त्याचा फटका पावणेदोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना बसणार आहे. कमी पटसंख्या असलेल्या शाळांना सुविधा पुरविता येत नाहीत, "तेथील विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण होत नाही', अशा युक्तिवादांचा टेकू यासाठी दिला जात असला तरी तो तोकडाच आहे. शासनाची इच्छाशक्ती असेल तर कमी पटसंख्या असलेल्या शाळेत अगदी एक विद्यार्थी असला तरी सुविधा निर्माण करता येतात. देशाचे भवितव्य असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सोयीसुविधा शासनाने केल्याच पाहिजेत, हे संविधानाला अभिप्रेत आहे.

कमी पटसंख्या असलेल्या शाळा ग्रामीण व दुर्गम भागात आहेत. तिथे अन्य सुविधांची तुलनेने कमतरता आहे. तरीही अशा परिस्थितीशी संघर्ष करुन तेथील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळा बंद केल्यास विद्यार्थ्यांना लांबच्या शाळेत जावे लागेल. अशा परिस्थितीत हजारो विद्यार्थ्यांचे–विशेषतः मुलींचे शिक्षण खंडित होण्याचा जास्त धोका आहे. एकीकडे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची भाषा करायची "राष्ट्रीय शिक्षण धोरणा'चे ढोल बडवायचे आणि दुसरीकडे गरीब, दलित, आदिवासी, कामगार, शेतकरी, शेतमजूर व अल्पसंख्याक घटकांतील मुलामुलींचे शालेय शिक्षण कायमचे थांबू शकेल अशी व्यवस्था निर्माण करायची, हा दुटप्पीपणा तर आहेच, पण यामागील मनुवादी विचारही किती काळ लपून राहणार?

देशात सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपीच्या) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची शिफारस होऊन साडेपाच दशके झाली आणि प्रत्यक्षात जेमतेम तीन ते साडेतीन टक्के रक्कम शिक्षणासाठी खर्च केली जाते. मात्र याचा दोषारोप यापूर्वीच्या सरकारांवर केव्हा करता आला असता? जेव्हा या सरकारने यापेक्षा मोठ्या प्रमाणात म्हणजे जीडीपीच्या पाच ते सहा टक्के निधी शिक्षणासाठी दिला असता तेव्हाच. याउलट आता आजवरची अडीच–तीन टक्के रक्कमसुद्धा जास्त असल्याचा भास शिंदे–फडणवीस सरकारला झाला आहे. त्यामुळेच शाळा दत्तक घेण्याचे आवाहन कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांना केले जात आहे.

एखाद्या देशाला युद्धात पराजित करण्यापेक्षा तेथील जनतेला शिक्षणापासून वंचित ठेवल्यास त्या देशाला गुलामगिरीकडे नेता येऊ शकते, हे काही धूर्तांना माहीत असते. सध्या भारताची आणि महाराष्ट्राची वाटचाल अशा गुलामगिरीच्या दिशेने सुरू झाली आहे. सध्याचे सरकार हे जनतेचे सरकार नसून व्यापाऱ्यांचे सरकार आहे. एकीकडे मराठा, धनगर आणि ओबीसींना आरक्षणाचे गाजर दाखवायचे आणि दुसरीकडे सरकारी नोकरी बंद करुन खासगी ठेकेदारांकडून नोकर भरती करायची. तसेच यूपीएससी, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन आदी विविध स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवून सचिव पदांच्या खासगी भरती करायच्या. ही अतिशय धक्कादायक बाब असून देशाची वाटचाल गुलामगिरीच्या दिशेने सुरू झाली आहे, असे खेदाने म्हणावे लागते.

शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का आणि कसे जगावे? जीवनाची सार्थकता कशात आहे? जीवन पूर्ण कसे करावे? आपण जीवनातून काय घ्यावे आणि इतरांना काय द्यावे, या सर्व प्रश्नांची उत्तरे शिक्षण देऊ शकते. शिक्षणामुळे माणसाचा सर्वांगीण विकास होतो, गुलामगिरीच्या बेड्या तो झुगारू शकतो. म्हणून तर पूर्वीच्या काळी बहुजन (बारा बलुतेदार, अठरा पगड जाती तसेच शेतीवर अवलंबून असलेले समाज) मुलांना औपचारिक शिक्षण घेण्यास बंदी होती. मात्र, हल्ली बहुजनांची मुले शिक्षण घेऊन पुढे जात असल्यामुळे नोकरी आणि शिक्षणात खासगीकरण करून बहुजनांच्या मुळावरच घाव घातला जात आहे.

खासगी शाळा आज ग्रामीण भागातही आहेत, पण खासगी शाळांमधील महागडे शिक्षण न परवडणारा एक मोठा वर्ग समाजात असून तो प्रामुख्याने सरकारी शाळांत येतो. या घटकातील विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळण्यासाठी सरकारने तिथे स्वखर्चाने सुविधा देण्याची आवश्यकता आहे. प्रत्यक्षात मात्र या सुविधा देण्यासाठी अडचणीकडे बोट दाखवून शाळा बंद करण्याचा वा खासगीकरणाचा प्रयत्न होतो आहे. त्यामुळे सुज्ञ नागरिकांनी, विचारवंतांनी, तरुणांनी, सामाजिक व राजकीय पदाधिकाऱ्यांनी आणि शिक्षकांनी संघटित होऊन सांसदीय मार्गाने सर्व समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन हा लढा लढला पाहिजे. तरच सरकारला जाग येईल.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जवाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# भारताला लागले, महासत्तेचे डोहाळे!

चंद्राचा प्रवास मनमोहक व अस्मितेला उंचावणारा होता तसेच या मोहिमेने जागतिक उंची सुद्धा गाठली. भारताच्या कामगिरीत तो मानाचा तुरा रोवला गेला. मात्र भारतातील दुसरी बाजू पाहता शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवीणारे व्यवस्थापन व धोरणे मात्र अतिशय उदासीन दिसते. चंद्राला जसे ग्रहण लागते तसे शेतकऱ्यांना राजनीतीचे ग्रहण लागले . उत्पादने वाढून शहरे पोसल्या गेली, पण शेती पिकवणारा शेतकरी मात्र जीवनात उदासीनता बाळगून अत्यवस्थ केला गेला. त्याची अनावस्था पाहता, राज्य व केंद्र शासनाची वाटचाल फक्त शहरी विकासाकडे होत आहे असेच चित्र जगाला दिसत आहे. उत्पादने वाढवून शेतकऱ्यांच्या जीवनात काही फरक पडला नाही. शेतकरी सुखी होत नाही तर शहरे पोसण्यासाठी मदत होते. ज्याला जिवंत ठेवण्याची गरज असताना त्याच्याच आत्महत्या घडवून, त्याला मारून टाकणारी ही कोणती देशाची बेवकूफ क्रांती आहे ? जो शेतकरी देशाची आर्थिक क्रांती घडवून आणू शकतो, त्याच शेतकऱ्यांची माती करणाऱ्या भारत देशाला महान म्हणावे काय? हा साधा आणि सोपा प्रश्न जन माणसाला आता वेड लावत आहे ?

शेतकऱ्याला बळीराजा, अन्नदाता, जगाचा पोशिंदा, अशा तकलादू गोष्टी लाऊन, त्यांच्यासाठी उदासीन धोरणे वापरुन त्यांना संपविणारा हा काळ आहे असे निश्चितच म्हणावे लागेल . अन आता तर जनतेला हिंदू राष्ट्र निर्माण करण्याचे, गांजर दाखवणार, तशी अभिलाषा तुम्ही तयार करनार? शहरीकरण वाढविण्यासाठी प्रोत्साहन देनार ना, मग शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा कलंक कोण पुसणार? त्यासाठी त्यांनी अनेक सरकारे बदलून पाहिले, पण मुळात कायदेच चुकीचे असल्यामुळे तो गंभीर व मुका होऊन अनभिज्ञ झाला. त्याला आता काय करावे हे सुचत नाही. जी सरकारी येत आहे त्यात त्याचाच बळी जात आहे. मूळ व्यवस्थापन चुकीचे असेल तर तो त्याला काय करणार? अन फक्त शेतकऱ्यांच्या दुःखाचा डांगोरा पसरविला जात आहे. अन आता डांगोरा पसरविणाऱ्यालाच आपली जागा दाखवण्याची वेळ शेतकरी, शेतमजुरावर आली आहे ? आताही फक्त लढाई जिंकायची असेल तर फक्त मतदानातूनच घडू शकते. जातीचे प्रतिनिधी पाठवूनच शेतकरी– शेतमजुराच्या अंगावर गोटे आले. म्हणजे. गेली ७५ वर्ष शेतकऱ्यांना फक्त मनस्तापच त्याच्या नशिबात होता काय ?

भारत देशाचा पंतप्रधान भरसभेत यादी वाचून भ्रष्टाचारांचा देश तयार झाला, असे जाहीर करतो. म्हणजे लुटारांची तिजोरी स्विस बँकेत, परदेशात जमा असल्याची चर्चा घडविते. मग शासनाच्या तिजोरीत फक्त लुटारू तयार होतात का? म्हणजेच भारताची व्याख्या तिजोरी लुटणाऱ्यांचा देश अशीच करावी लागणार आहे काय? आणि हेच लुटारू जनतेला महासत्ता करण्याचे स्वप्न दाखविनार आहेत. ज्या देशाची आर्थिक धोरणच मजबूत नाही, तो देश महासत्ता कसा होणार? तर मग ,भारत देश शेतकऱ्याना मारुनच, व त्यांच्या आत्महत्या घडवूनच महासत्ता होणार आहे काय ? जर असे झाले तर.... भारत देशाची विचारधारा ही कोणत्या बाजूने वाहते, याची कल्पना करणे गरजेचे आहे?

शेतकऱ्यांना मारुनच, देशाची प्रगती करणारा हा जगातील पहिला नंबरचा देश ठरणार आहे का? असे सविंधान स्वतंत्र असलेल्या देशाचे असू शकते काय? असे संविधान हे फक्त सत्तापीपासू लोकांच्याच फायद्याचे असू शकते, देशाचा सर्वांगीण विकास घडविणारा घटक म्हणजेच शेतकरी. त्याचेच बेहाल करणारे सत्ताधीश व शासनाची धोरणे असेल, तर यालाच तुम्ही महासत्ता म्हनणार काय? पारतंर्यात ठेवणाऱ्या शेतकऱ्याला अंधारात ठेवून, गुलामीत ठेवून,देश महासत्ता होण्याचे स्वप्न बघनार आहे काय? अशी परिस्थिती चालविणारा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडविणारा जगातला भारत हा पहिला देश तर ठरणार नाही ना ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ संविधान १८ जून १९५१ ला पहिली घटना, परिशिष्ट नऊ मध्ये दुरुस्ती करुन कां तोडले गेले तर, शेतकऱ्यांच्या विरोधात कायदे बनवून ते शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडविण्यासाठीच तोडल्या गेले होते हे आता स्पष्ट झाले.

म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुन्हा लोकसभेत कॉंग्रेसने निवडून येऊ दिले नाही, हे वास्तव आहे. भंडाराच्या निवडणुकीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव हे त्याचे जिवंत उदाहरण आहे.

डॉ. आंबेडकरांचा लोकसभेत फोटो चालतो, पण संविधान लिहीणाऱ्याचे प्रतिनिधित्व चालत नाही हा देशाला कलंक आहे. त्यावेळेस जर डॉ. बाबासाहेब लोकसभेत पोहोचले असते तर आज ही शेतकरी–शेतमजूरावर आत्महत्येची वेळ आली नसती. बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजशास्त्राबरोबरच जागतिक अर्थशास्त्राचे सुद्धा प्रणेते होते. त्यांनी कायदे शास्त्रात बॅरिस्टरची पदवी मिळविली व अर्थशास्त्रा मध्ये डॉक्टरेट झाले. या भारत देशात बुद्धिवंतांना विधान भवन, व लोकसभेत पोहोचू दिल्या जात नाही, विचित्र खेळी खेळल्या जाऊन डॉक्टर बाबासाहेब यांना पराभव स्वीकारावा लागतो हीच फार मोठी शोकांतिका आहे. आणि तेव्हाच डॉ. बाबासाहेबांनी कॉंग्रेस हे सामान्य जनतेसाठी जळते घर आहे असे जाहीर केले. या विचित्र खेळीमुळे शेतकरी शेतमजुरांच्या जीवनाचा सत्यानांस झाला. डॉ. बाबासाहेबा सारखे विशाल दृष्टिकोन असलेले व्यक्तिमत्व संसदेत पोहोचल्या गेले नाही. त्याच पराभवाचे पडसाद आज समाज, शेतकरी–शेतमजूर भोगत आहे. म्हणूनच, निवडणुकीत सध्या नट–नट्या, क्रिकेट पटू व जातीचे गांजर खेळल्या जात आहे. कारण लोकसभा व तेथील संसदपटू हेच खरे आर्थिक धोरणाचे केंद्रबिंदू असतात .

"ना हिंदू खतरे मे है, ना मुस्लिम खतरे मे है, अभी तो इस देश का किसान खतरे मे है"

जगाचा पोशिंदा, शेतकरी आपल्या हक्काचे, शेतीमालाचे जर दाम मागत असेल तर या देशातील शासन व कायदे त्याला गुन्हेगार समजून कोर्ट केसेस व पोलीस कोठडी, लाठीहल्ला, अश्रूधुराच्या नळ कांड्या व शेवटी गोळीबाराला समोर जावे लागते ? असे कायदे सहन करणारी भारत देशातील जनता, ही सुज्ञ आहे की, मूर्ख आहे, हे कोण ठरवीणार, असे कायदे बनवीणारा व त्या माध्यमातून सत्ता, अन् जनतेवर राज्य करणारा, जगातला भारत देश हा बळीराजाचा मित्र आहे की शत्रू आहे, हे कोण सांगणार? महाराष्ट्रात आरक्षणासाठी जातीचे वारे पसरत आहे, असे हे निवडणुकीच्या तोंडावर येणारे प्रश्न सामान्य जनतेला घायाळ करणारे असतात, तुम्ही पुंगी वाजवायची, मंत्री पद, घ्यायची आणि या पाठीमागे राजकीय शक्तीचा हात असतो. जातीचे भांडने लावून तमाशा बघायचा, हे आता काही नवीन राहिले नाही. ज्या बळीराजाच्या जीवनाच आरक्षण शासनाच्या चुकीच्या धोरणामुळेच खतम झाले, तर आता बोटावर मोजण्या इतक्या जातीसाठी आरक्षण देऊन देश सुखी होईल काय ?. ज्यांना बहुजन समाजाचे भान राहिले नाही ते आता खोटे ढोल पीटवायला निघाले आहे. नगारे वाजवून निवडणुका जिंकायच्या तयारीत लागले आहेत. अजूनही पुढील काळात जातीचे तमासेच उभे होणार आहेत, कारण मूळ आर्थिक धोरणालाच बगल द्यायची आहे.

ज्या दिवशी शेतकऱ्यांच्या आर्थिक धोरणावर निवडणूका होतील, त्या दिवशी खऱ्या अर्थाने शेतकरी स्वतंत्र झाला असे वाटेल. आणि जर शेतकऱ्यांच्या बाजूने राज्यात व केंद्रात "स्वतंत्र शेतकरी मंत्रालय" उभे होण्याचे स्वप्न जर पूर्ण झाले तर त्यात शेतकरी हीताचे कायदेच केले जातील, शेतकऱ्यांना न्याय, व समस्या सोडविण्यासाठी जर त्या मंत्रालयात विचार झाला,अन् अशी शेतकऱ्यांची बाजू समजून घेणारी व्यवस्था तयार झाली तर नक्कीच या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या संपल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी म स्वतंत्र शेतकरी मंत्रालय म उभे करण्याची आवश्यकता आहे. जनजागृती होऊन त्या चळवळीला सहकार्य करणे, आर्थिक पाठबळ देणे गरजेचे आहे? व जनतेला मतदानातून दाखविण्याची गरज तयार झाली आहे. जर हे मतदानातून घडले तर नक्कीच मुक क्रांती घडल्याशिवाय राहणार नाही.

**जनता डोळे लावून बसली आहे का? –**

पक्षाधिश हे आमदार, खासदारांना गुलाम बनवितात, आणि जर निवडणूक आयोग हे केंद्र सरकारने मंत्रिमंडळाच्या अधिकारात त्यासाठीच ठेवले आहे काय? केंद्र व राज्य सरकारने जनतेने निवडून पाठविलेले पक्षप्रतीनिधी फोडण्यासाठी, दुरुस्त केलेल्या संविधानाचा उपयोग करीत आहेत? जर या देशात फक्त सत्ता बदलविण्यासाठी व ती टिकवण्यासाठी पक्षाच्या सोयीचे कायदे तयार केल्या जात असेल, अन तोडा फोडी करूनच राज्य चालवल्या जात असेल अन् आमदार, खासदार हे त्याला पाठिंबा देत असेल तर ते लोकप्रतीनिधी नसून ते लाचार व गुलाम पक्षप्रतिनिधी आहेत. निवडून पाठविलेला प्रतिनिधी हा जनतेचा आदेश न मानता पक्षाचा आदेश शिरोधार्थ मानतो, इथेच सर्व लोकशाही व्यवस्था फसलेली आहे. पक्ष प्रतिनिधी असेल तर जनता सुद्धा गुलाम होणार नाही काय?

शेतकरी विरोधी कायदे तयार करुन, व पक्ष प्रतिनिधीला फोडण्यासाठी, मतदान करणाऱ्या जनतेची किंमत कमजोर केल्या जात आहे? तर आता असे जनतेला मूर्ख बनवीणारे कायदे कधी संपणार आहेत? आता राज्यकर्त्यांची सत्ता, हीच महासत्ता होत आहे?

महात्मा गांधीनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गावाकडे चला असा नारा दिला होता , संविधानाप्रमाणे देश चालविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व शेतकऱ्यांच्या हितासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता शेतकऱ्याला अर्पण केली व शेतकऱ्यांचे आर्थिक स्वातंर्त्यासाठी शरद जोशीनी रस्त्यावरची क्रांती घडवीली , हे सर्व आम जनतेच्या सुखासाठी, भवितव्यासाठी झटले होते ना? भारताच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी च यांनी वसा घेतला होता ना? तर आता जनतेला प्रश्न पडतो या थोर पुरुषांनी भारतात येऊन जन्म कशासाठी घेतला होता? चुकीचे धोरणे राबवीनारांच्याच हाती सत्ता देण्यासाठी घेतला होता काय? अन अशीच सत्ता चालविण्याचे स्वप्न असेल, पण शेतकरी, शेतमजुराला गांजर दाखविल्या जात असेल तर शेतकरी– शेतमजुराचे पुन्हा बेहाल झाल्याशिवाय राहणार नाही? हे सूर्यप्रकाशा इतके सत्य आहे, आता हे सर्व ठरवण्याची वेळच, जनतेवर आली आहे? अन ते फक्त तुमच्याच एका मताने घडू शकते. देश जर जागतिक महासत्तेच्या यादीत जर अग्रक्रमाने येत असेल तर तो आमचा स्वाभिमान आहे, पण तो सर्वांगीण जनतेचा विकास घडवून जर महासत्ता होत असेल तर त्याचा नक्कीच आम्हाला अभिमान वाटेल. तर त्यासाठी स्वच्छ प्रतिनिधी, शेती क्षेत्रातील आर्थिक अभ्यासू नेते विधान भवन व संसदेत पाठवण्याची गरज आता भासत आहे.

"सरकारचे धोरण, हेच शेतकऱ्यांचे मरण."

"इडा पिडा टळणार आहे, स्वतंत्र शेतकरी मंत्रालय येणार आहे."



**धनंजय पाटील काकडे**
९८९०३६८०५८.शेतकरी, वारकरी–कष्टकरी महासंघ. महाराष्ट्र राज्य.

## रंगभूमीची सेवा करण्यासाठी झाडीपट्टी सज्ज; दिवाळीनंतर होणाऱ्या नाटकाची बुकिंग सुरू, १५० वर्षाची परंपरा

**झाडीपट्टी रंगभूमीला दीडशे वर्षाची परंपरा आहे. नवा शोध नेहमी कलेच्या माध्यमातून होत असतो. मनोरंजनातून प्रबोधन आणि प्रबोधनातून परिवर्तन ही नांदी झाली पाहिजे. लेखकांनी नवनवीन विषय घेऊन सर्जनशीलता तद्वांनी करावी आणि हे आवश्यक आहे.**

**–मंगेश मेश्राम नाटकाचे अभ्यासाक**

**झाडीपट्टी रंगभूमीला एकूणच दीडशे वर्षाची परंपरा लाभली आहे. हा काळ फार महत्त्वाचा समजला जातो. यावर अनेकांनी आपली छाप पडली आहे .याचे खरे श्रेय रसिकांना जाते. कारण तेच खरे शिलेदार आहेत.**

**–युवराज गोंगले लेखक निर्माता व दिग्दर्शक, झाडीपट्टी**

**गोंदिया :** विदर्भाच्या मातीत अनेक कलावंतांनी जन्म घेऊन रंगदेवतेची सतत रंगभूमीवर नानाविध प्रयोग करुन आपल्या अभिनयाची छाप पाडली. आणि झाडीपट्टी हे एक व्यासपीठ तयार झाले. या रंगभूमीची सेवा करण्यासाठी वडसा, देसाईगंज येथे शेकोडोच्या संख्येने झाडीपट्टीत नाटक मंडळाच्या ऑफिस, बुकींग केंद्र अश्या दुकानदाऱ्या थाटल्याचे चित्र पाहावयास मिळते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विदर्भातील नावाजलेली झाडीपट्टी नाटकांच्या माध्यमातून पोहचलेली आहे. या कलादालनात आता हजारोच्या कलाकृतीने रंगभूमी ही नाटकाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य अविरत करीत आहे.

पुर्व विदर्भातील जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागातील गावकुसात राहणारा कलाकार आता झाडीपट्टी व झाडीवूडच्या पडद्यावर चमकताना दिसतो. ही अभिनयाची छावणी म्हणावी लागेल. या झाडीपट्टीमध्ये उच्चशिक्षित कलेच्या व नाटकाचे विषयाचे शिक्षण घेऊन संशोधनही करतात. वेगवेगळ्या प्रकारच्या नाटकाचा इतिहास कसा होता. कोणत्या नाटका कोणत्या कालावधीत प्रसिद्ध होऊन नावारुपास आल्या याचाही शोध झाडीपट्टीच्या लेखकांनी, इतिहासकारांनी; संशोधकांनी व कलावंतांनी घेतला आहे. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक व लावणीप्रधान नाटकांमधून समाजाला प्रबोधनात्मक संदेश देण्याचा काम आजही झाडीपट्टी करीत आहे.



पोळा संपला की झाडीपट्टीच्या मातीत रंगभूमीची अविरत सेवा करण्यासाठी शंभराहुन अधिक नाटक कंपन्या सुरू झाल्या आहेत. उत्तम व दर्जेदार नाटके चांगली सादर करता येईल अश्यांची मोठ्या प्रमाणावर बुकिंग सुरू झाली आहे. अनेक लेखकांनी विविध नाटके लिहून मंडळाला दिल्या. कलाकारांच्या तालीमाची रंगतगंमत सुरू झाली. कलेला नवा आयाम कसा देता येईल याचाही चांगला प्रयत्न कलावंत मंडळी करीत आहेत.

## धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयात हात धुवा

गोंदिया: जागतिक हात धुवा दिवस धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयाच्या सायन्स फोरम आणि सुक्ष्म जीवशास्त्र आणि बायोटेक्नॉलाजी विभागातर्फे साजरा करण्यात आला आहे. दरवर्षी १५ ऑक्टोबर हा संसर्गजन्य आजार टाळण्यासाठी एक प्रभावी मार्ग म्हणून साबणाने हात धुण्याच्या महत्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक स्तरावर निर्माण करण्यासाठी जागतिक स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येतात. या दिवसांचे औचित्य साधून धोटे बंधू महाविद्यालयात प्राचार्य डॉ. अंजन नायडू यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपप्राचार्य जयंत महाखोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरविभागीय स्कीट स्पर्धा आयोजित केली.

# सरकारीकरणाच्या विरोधात खाजगीकरण, कंत्राटीकरण

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर, स्वांतत्र्य हा कळीचा विषय आहे. स्वांतत्र्य हे केवळ देशाचा भूभाग स्वतंत्र होणे, इतकेच मर्यादित नाही. देशातील प्रत्येक स्त्री–पुरुषाला ते आपले सर्वांचे स्वातंत्र्य आहे, याची अनुभुती मिळाली पाहिजे. स्वातंर्त्य हे जीवनमूल्य आहे. म्हणुनच स्वातंर्त्याच्या आंदोलनात सामाजिक स्वातंत्र्य, वैयक्तिक स्वातंत्र्य यासोबतच बंधुता आणि समता याही जीवन मूल्यांची चर्चा मोठ्या प्रमाणात झाली. साम्राज्यवादी धोरणात जनतेच्या कल्याणाकडे दुर्लक्ष केले जाते. कष्टकऱ्यांचे शोषण केले जाते. याही मुद्यांची चर्चा स्वातंत्र्य आंदोलनात झाली. यासोबतच जातिव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर होणारे स्त्री–शुद्रातीशुद्र कष्टकरी, शेतकरी बहुजनांचे , पुरोहितशाही (धर्म व्यवस्था) आणि भांडवलशाहीच्या माध्यमातून होणारे शोषण थांबले पाहिजे, याप्रकारचीही चर्चा मोठ्या प्रमाणात झाली. त्यातुनच आर्थिक समृद्धीच्या दिशेने पावले टाकतानाच, मानवी मूल्यांच्या दिशेने प्रवास झाला पाहिजे, असाही आग्रह धरण्यात आला. सर्व प्रकारच्या विषमतेला, बनावट, कृत्रिम धर्म कल्पनांचा नायवाट करण्यासाठी मानवी मूल्याधिष्ठित शिक्षणाचा विचार पुढे आला. स्वातंत्र्याच्या आंदोलनाला केवळ इंग्रजहटाव आंदोलन म्हणून लोकांचे पाठबळ मिळाले नाही. लोककल्याणकारी विचाराची बैठक असलेल्या विविध समतावादी तत्वांनी, प्रवाहांनी त्यात सहभाग घेतल्याने ते जनतेचे आंदोलन झाले. मानवी कल्याणाचा विचार, सत्यशोधकी परंपरा आणि संत परंपरेतून आला. लोकशाही व्यवस्थेला व्यापक मजबुती देण्याचे काम या परंपरेने केले. मानवी मूल्ये मनामनात रुजवली. या पार्श्वभूमीवर, देशातील कोणत्याही व्यक्तीचे शोषण होणार नाही या हमीसह स्वातंर्त्य आंदोलन पुढे गेले. या सर्वांचा परिणाम १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंर्त्य मिळाले. स्वातंत्र्याचे सुराज्यात, प्रत्येक नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणाऱ्याा प्रजातंत्रात रुपांतर करण्यासाठी शोषणरहीत धर्मनिरपेक्ष, लोकशाही, समाजवादी, प्रजासत्ताक व्यवस्था स्विकारण्यात आली.



लोकांचे शोषण होऊ नये, यासाठीच कित्येक संस्थांचे सार्वजनिक संस्थांमध्ये रुपांतर करण्यात आले. अनेक संस्थांचे राष्ट्रीयकरण, सरकारीकरण करण्यात आले. त्यामुळे नफा कमावणे हे उद्दिष्ट न राहता त्या संस्थांमध्ये निश्चित वेतनाची व्यवस्था आणि सर्व जनतेला लाभ मिळण्याच्या दृष्टीने आरोग्य, शिक्षण, बँक तसेच इतरही इन्स्टिट्यूशन्शचे शासकीय नेटवर्क तयार करण्यात आले.

मा. इंदिरा गांधी प्रधानमंत्री असताना त्यांनी घेतलेल्या बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा निर्णय लोकहिताचा ठरला. या सगळ्या पार्श्वभूमीवर खाजगीकरण करणे, कंत्राटीकरण करणे, या धोरणांचा विचार आपल्याला करावा लागेल. मनात येईल तसे बोलणारे मूल्यव्यवस्थेचा विचार करतात काय? याचा विचार करावा लागेल. एकीकडे मनुष्यबळ ही आपल्या देशाची ताकद आहे म्हणणारे, बेरोजगार युवकांना बेठबिगारीच्या चक्रात ढकलत असेल, खाजगी कंपन्यांना अत्यंत कमी पगारात बेरोजगार युवकांकडून काम करवून घेण्याची सुट देत असेल, मोठी कर आकारणी करून सरकारी तिजोरी भरण्याला देशाची प्रगती समजत असेल तर ही आपल्या लोकांच्या आशा आकांक्षांना पायदळी तुडविणारी बाब आहे. समाजवादी, लोककल्याणकारी धोरणाला बाधा पोचवणारी कृती आहे, कामगार कल्याण कायद्यांना हरताळ फासणारी निती आहे. बेरोजगार युवकांना हतबल करणाऱ्या खाजगीकरण, कंत्राटीकरण धोरणांचा, शेतकरी विरोधी धोरणांचा, ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेला मोडित काढू पाहणाऱ्या धोरणांचा जोरदार विरोध सर्वांना करावा लागेल. युवकांना कर्मचारी विरोधात भडकावून, बेरोजगार युवकांच्या विरोधात असे निर्णय घेणाऱ्यांचा युवकांनी विरोध केला पाहिजे. एका कर्मचाऱ्यांच्या पगारात तीन युवकांना लावून बचत करु पाहणारे, युवकांना आर्थिक शोषणाच्या विळख्यात लोटू पाहत आहे.

कामगार कायद्याच्या अडथळ्यामुळे सरकारला असे करता येणे शक्य होणार नाही याची कल्पना आल्याने, कत्राटदारांकडे युवकांच्या शोषणाचे कंत्राट दिल्या जात आहे. सरकारीकरण आणि खाजगीकरण, कंत्राटीकरण यातला फरक ओळखून भूमिका घ्यावी लागेल. अत्यल्प पगारात काम करुन घेण्याची वृत्ती ही युवकांना वैफल्याच्या खाईत लोटणारी ठरेल. शासनात महत्वाच्या पदावर बसलेले लोकं जर, मुलभूत गरजांचा विचार न करता अत्यल्प पगारात युवकांकडून कामे करुन घ्यायचा विचार करत असेल तर खाजगी संस्थांना कामगारांचे शोषण करायला मोकळीक देण्याचा हा प्रकार आहे. शोषणाविरुद्धच्या मूलभूत अधिकाराची काळजी वाहण्याची जबाबदारी आहे की नाही? भक्त निर्बुद्धपणे अशा गोष्टींचे समर्थन करताना दिसत असले तरी त्यांच्याही मुलांच्या वाट्याला ही वेठबिगारी येणार आहे. धर्माच्या नावाने बेरोजगार तरुणांना भूल देऊन युवकांना भ्रमित करणे, कर्मचारी विरोधात युवकांची मती भडकवून त्यांची कमी पगारात काम करण्याची मानसिकता घडविली जाणे, हे विघातक आहे. कारखानदारांना अधिकाधिक नफा कमवून देण्याच्या नादात, बेरोजगार युवकांच्या स्वप्नांचा चुराडा केला जात आहे. यात कष्टकरी , शेतकरी बहुजन समाजातील तरुण तरुणी सर्वाधिक भरडल्या जाणार आहे. म्हणून कर्मचारी, शेतकरी, विद्यार्थी, युवा इत्यादी सर्वांनी एकत्रितपणे या सर्वसामान्यांच्या विरोधातील षडयंत्र हाणून पाडले पाहिजे.

**जय सत्यशोधक!**
**सत्य की जय हो!**
**बाबा बीडकर**

# जिल्ह्यातील ९०० पाणीपुरवठा योजना सौरऊर्जेवर

## ८ कोटी रुपयांच्या वीजबिलाची होणार बचत: वीजपुरठक्याची अडचण होणार दुर

**गोंदिया:** जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागामार्फत जलजीवन मिशन योजना राबविण्यात येत आहे. मात्र, वीजबिल न भरल्याने पाणीपुरवठा कनेक्शन खंडित केले आहे. त्यामुळे पाणीपुरवठा ठप्प होतो. ही समस्ता लक्षात घेऊन यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने पाणीपुरवठा योजना वीजजोडणीऐवजी सौरऊर्जेवर चालविण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील जवळपास ९०० पाणीपुरवठा योजना सौरऊर्जेवर चालविण्यात येणार असल्याने वर्षाकाठी ८ कोटी रुपयांची



वीजबिलाची बचत करणे शक्य होणार आहे.

सौरऊर्जेच्या माध्यमातून प्रत्येक घरात शुद्ध पाणी पोहोचणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने या योजनेचे काम आता युद्धपातळीवर सुरु केले आहे. प्रत्येक व्यक्तीला शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, या उद्देशाने जलजीवन मिशन योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेतून प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचविले जाणार आहे. मात्र, अनेक पाणीपुरवठा योजना वीजजोडणीवर चालविल्या जात आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाला दरमहा लाखो रुपयांचे वीजबिल भरावे लागते. वीजबिल वेळेवर न भरल्यास पाणीपुरवठा खंडित केला जातो.

वीजपुरवठा खंडित केल्याने ग्राहकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. ग्राहकांना विहिरी आणि बोअरवेलचे दुषित पाणी वापरावे लागते. पाणीपुरवठा योजनांची वीजजोडणी खंडित झाल्याने अनेक योजना बंद पडल्या आहेत. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्रशासनाने वीजजोडणीऐवजी सौरऊर्जा उपकरणाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. या योजनेमुळे वीजबिलांमध्ये अंदाजे ८ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

### सौरऊर्जेची उपकरणे लावण्याचे काम सुरु

**जलजीवन मिशन योजनेअंतर्गत १२२२ योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. त्यापैकी ९०० योजनांवर ३३ किलोवॅट सौरऊर्जेची उपकरणे बसविण्यात येणार असून त्याचे कामही सुरु झाले आहे. लवकरच सौरऊर्जेद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी प्रत्येक घरात पोहोचेल.**

# बाजार समिती सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे का?

## सत्ताप्राप्तीसाठी कुरघोडीचे राजकारण: आर्थिक उलाढाल कोटीच्या घरात



**गोंदिया:** शेतमाल खरेदीत महत्वपूर्ण भूमिका बजाविणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका मागील महिन्यात होऊन निकालसुद्धा जाहीर झाले. जिल्ह्यातील सात कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये वेगवेगळ्या भागांत सत्तेसाठी एकमेकांवर कुरघोडी झाली, तर कुठे वाद निर्माण झाला. त्यामुळे प्रश्न पडतो की, कृषी उत्पन्न बाजार समिती सोन्याचे अंडी देणारी आहे का?

गोंदिया जिल्ह्यात गोंदिया, आमगाव, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, देवरी, तिरोडा अशा एकूण कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्यांची आर्थिक स्थिती मजबूत राहत असल्याने त्यावर आपल्या गटाचे वर्चस्व राहावे, हे प्रत्येकालाच वाटते. कारण की बाजार समिती सोन्याची अंडी देणारी कोंबळी आहे का? असा सवाल सर्वसामान्यांना पडत आहे.

### जिल्ह्यातील बाजार समित्यांची आर्थिक स्थिती

| बाजार समिती | उत्पन्न (कोटीत) | खर्च |
|---|---|---|
| गोंदिया | ५ कोटी | २ कोटी १० लाख रुपये |
| तिरोडा | २ कोटी ५० लाख | ९७ लाख रुपये |
| गोरेगाव | २ कोटी | ९० लाख रुपये |
| सडक अर्जुनी | १ कोटी ६० लाख | ४० लाख रुपये |
| अर्जुनी मोरगाव | १ कोटी | ६० लाख रुपये |
| देवरी | १ कोटी ५० लाख | ३८ लाख रुपये |
| आमगाव | २ कोटी ३४ लाखड | १ कोटी ८ लाख रुपये |

### शेतकऱ्यांची फसवणूक थांबणार का?

**कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये व्यापारी, अडते यांच्याकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होते. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. मध्यस्थी करणारे दलालच यासाठी कारणीभूत असतात. याशिवाय सर्वच शेतमालाची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समित्या करीत नाहीत.**

### सोयीसुविधांचा अभाव

**कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांसाठी सोयी सुविधांचा अभाव आहे. येथे माल विक्रीसाठी आणल्यानंतर शेतकऱ्यांना सुविधा मिळत नसल्याची ओरड शेतकऱ्यांकडून होते. मात्र यात कसलीही सुधारणा केली जात नसल्याचे चित्र आहे.**

### कोणत्या बाजार समितीवर कोणाचे वर्चस्व

| बाजार समिती | वर्चस्व |
|---|---|
| गोंदिया | चाबी, काँग्रेस |
| तिरोडा | भाजप |
| गोरेगाव | भाजप |
| सडक अर्जुनी | |
| अर्जुनी मोरगाव | |
| देवरी | भाजप |
| आमगाव | भाजप |

### आव्हाने काय?

**गोंदिया जिल्ह्यातील एकही कृषी उत्पन्न बाजार समिती मका, चणा व गव्हाची खरेदी करीत नाही.**

**शेतकऱ्यंच्या प्रत्येक शेतमालाला शासकीय हमीभाव मिळण्याची कृउबासमध्ये सोय नाही.**

**काही कृउबासमध्ये मोठे गोदाम नसल्याने येथे अधिक मालाची खरेदी करता येत नाही.**

# महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या राज्य सहसचिव पदी आशिष प्र.रामटेके यांची निवड

**गोंदिया:-** महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये नवीन राज्य कार्यकारणी गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य अधिवेशन नागपूर येथील आमदार निवास येथे पार पडले. त्या अधिवेशनात महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना मुंबई नागपूर विभागाच्या सहसचिवपदी सदर संघटनेचे गोंदिया जिल्हाध्यक्ष आशिष प्र. रामटेके यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



आशिष प्र. रामटेके हे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे देखील राज्य सहसचिव या पदावर कार्यरत असून जुनी पेन्शन योजना विषयक लढ्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग आहे. सदर नियुक्तीबद्दल श्री रामटेके यांचे महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना मुंबईचे राज्य अध्यक्ष जीवन अहिर, किशोर हटकर सरचिटणीस, लक्ष्मण नरमवार कार्याध्यक्ष, विभागीय अध्यक्ष नागपूर विभाग तसेच राज्य समन्वयक राजूभाऊ धांडे, देवेंद्र शिंदोडकर जिल्हाध्यक्ष नागपूर, शैलेश धात्रक जिल्हाध्यक्ष चंद्रपूर, चंदू प्रधान जिल्हाध्यक्ष गडचिरोली, शिवशंकर साखरवाडे जिल्हाध्यक्ष भंडारा, राकेश डोंगरे जिल्हा सरचिटणीस गोंदिया आदींनी अभिनंदन केले आहे.

# कलाम साहेबांचा संघर्ष,आदर्श प्रेरणादायी: खेमेंद्र कटरे

**गोंदिया** :-मिसाईल मॅन म्हणून प्रसिद्ध असलेले भारताचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम साहेब यांचा वाढदिवस रविवारी १५ ऑक्टोबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील वृत्तपत्र वितरण केंद्रात "वृत्तपत्र दिन' म्हणून साजरा करण्यात आला.





यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संपादक खेमेंद्र कटरे व महाराष्ट्र वृत्तपत्र विक्रेता संघाचे सचिव दिनेश उके यांच्या हस्ते माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम साहेब यांच्या छायाचित्रा ला पुष्पहार अर्पण करुन शुभेच्छांची देवाण घेवाण करण्यात आली. या प्रसंगी मिठाई चे वितरण करीत

वृत्तपत्र विक्रेत्यांनी आनंदोत्सव साजरा केला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले संपादक खेमेंद्र कटरे यांनी आपल्या भाषणात मिसाईल मॅन म्हणून प्रसिद्ध भारताचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला आणि सांगितले की, सुरुवातीच्या काळात त्यांचे जीवनात, कलाम साहेब चेन्नई शहरातील एका चौकात वृत्तपत्रे विकून संघर्ष करत जीवन सुरू केले. यानंतर उच्च शिक्षण पूर्ण करून त्यांनी संशोधन क्षेत्रात स्वत: चा ठसा उमटवला. ते भारताचे महान संशोधक झाले. ते देशात इतके प्रसिद्ध होते की, देशाच्या सरकारने त्यांना भारताचे राष्ट्रपती केले. आमचे कलाम साहेबांचा लढा व प्रेरणादायी विचार आपल्या जीवनात आणून वृत्तपत्र विक्रेते बांधवांनी आपले जीवन प्रगतीशील बनविण्याचा विचार करावा, असे मत यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन पत्रकार संजय राऊत यांनी केले. यावेळी गोंदिया जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष प्रमोद भोयर, दिनेश उके, दुर्गा प्रसाद अग्रहरी, राजेश वैद्य, जावेद अन्सारी, पोलीस पाटील प्रवीण कोचे, हर्षदीप उके, पियुष सोनवणे, अनिमेष रामटेके, शैलेंद्र ठाकूर, राजू ठाकूर, सचिन अवचट, हरजित वाढई, तुषार,बारेवार, हेमंत हलमारे, रमेश भोयर, रमाकांत वैद्य, आर्यन, अमित गणवीर, कामेश सेलोकर, महेश तरोणे, राजेश कडव, राजेश साठवणे, विजय राऊत, कमलेश भोयर, अजय यादव, दत्ता गजभिये, प्रवीण वासनिक, जयेश गजभिये, प्रकाश साखरे, रामू शरणागत आदी वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते.

### अभय यावलकर २० ऑक्टोबरला जिल्हा दौ-यावर

भंडारा,राज्य लोकसेवा हक्क आयुक्त अभय यावलकर २० ऑक्टोबरला जिल्हा दौ-यावर येत आहे.२० ऑक्टोबर रोजी भंडारा येथे दुपारी १२ वाजता नियोजन सभागृहात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ याबाबत सर्व विभागप्रमुखांचा आढावा घेतील. दुपारी २.३० वाजता अधिनियमातंर्गत उपविभागीय अधिकारी, भंडारा शहर व ग्रामीण यांची कार्यालयीन तपासणी करतील.

# वार्ड क्र. १० व १३ मधील मिळकतींचे चौकशी काम सुरु

## ड्रोनद्वारे होत आहे नगर परिषद क्षेत्राचे भूमापन





**गोंदिया :-** गोंदिया नगर परिषद हद्दीतील क्षेत्राचे नगर भूमापन करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या २७ जुलै २०२० चे शासन निर्णयानुसार तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांचे २७ एप्रिल २०२० चे पत्रानुसार पथदशी प्रकल्पाकरीता निवड करुन ड्रोन द्वारे भूमापनाचे काम दि.२ ऑक्टोबर २०२२ रोजी पूर्ण झालेले आहे. त्यानुषंगाने पथदर्शी प्रकल्प नगर परिषद गोंदियाचे हद्दीमध्ये समाविष्ट गावातील क्षेत्राचे व हद्दीचे सीमा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. ड्रोन द्वारे भूमापन झालेल्या क्षेत्राचे नकाशे उप अधीक्षक, भूमी अभिलेख गोंदिया कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर नकाशा डिजीटल फॉर्मेट मध्ये असल्याने त्यांचा वापर करण्याकरीता जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांचे कार्यालयाकडून आज्ञावली विकसित करुन प्रत्येक मिळकतींचे (घर, खाली प्लॉट इत्यादी) जागेवर जाऊन चौकशी करण्यात येणार आहे व प्रत्येक मिळकतींचे मालक/ धारक यांची नोंद करुन आज्ञावलीद्वारे नकाशामध्ये प्रत्येक मिळकतींचा वेगळा नकाशा तयार केला जाणार आहे. यामुळे प्रत्येक मिळकतींचे क्षेत्र किती आहे, त्यांची हद्द व मालक/ धारक यांची नोंद होणार आहे.

यामुळे शहर वासियांचे नागरी हक्काचे संवर्धन होईल. शहराचे रस्ते, शासनाच्या मिळकती, खुल्या जागा, नाले इत्यादींच्या सीमा निश्चित होऊन अतिक्रमणे थांबविता येईल. तसेच प्रत्येक मिळकत धारकांना त्यांचे हक्काचे पुरावे प्राप्त होतील. मिळकत धारकांना त्यांच्या मिळकतीवर कर्ज तसेच इतर सुविधा उपलब्ध होऊन नगर परिषदेची कर आकारणी, बांधकाम परवानगी यासाठी अभिलेख व नकाशा उपलब्ध होईल. याकरीता उप अधीक्षक भूमी अभिलेख गोंदिया कार्यालयाकडून प्रायोगिक तत्वावर नगर परिषद हद्दीतील वार्ड क्र.१० व १३ ची निवड केली असून सदर दोन्ही वार्डामध्ये चौकशीचे काम सुरु आहे.

तरी वार्ड क्र.१० व १३ मधील मिळकत धारकांना/नागरिकांना उप अधीक्षक भूमी अभिलेख गोंदिया कार्यालयाकडून आवाहन करण्यात येते की, आपण घरी/जागेवर सदर कार्यालयाकडून येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. तसेच मिळकतींचे धारक/मालक ठरविण्याकरीता नागरिकांनी त्यांचे मालकीयत जमिनीचे पुरावे जसे-सातबारा, खरेदी खत, कर पावती तसेच आधार कार्ड, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादींची माहिती पुरवावी. असे उप अधीक्षक भूमी अभिलेख प्रमोद बोकडे यांनी कळविले आहे.

# ओबीसी महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत इतर मागासवर्गीयांसाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. यांअंतर्गत कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व मध्यम उद्योग, विक्री व सेवा आदींचा समावेश आहे. तसेच स्वयंरोजगार किंवा रोजगार प्राप्त करण्याठी "कौशल्य विकास प्रशिक्षण योजना' आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी "शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना' महामंडळातर्फे राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक विशाखा फडणवीस यांनी केले आहे.





### बीज भांडवल कर्ज योजना

राष्ट्रीयकृत बँकेमार्फत पाच लाखपर्यंतच्या प्रकल्पासाठी कर्ज उपलब्ध करण्यात येते. यात लाभार्थ्यांचा केवळ ५ टक्के सहभाग असून महामंडळाचा २० टक्के व बँकेचा ७५ टक्के सहभाग असतो. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. महामंडळाच्या रक्कमेवर ६ टक्के वार्षीक व्याज दर तर बँकेच्या रक्कमेवर बँक नियमानुसार व्याज दर आकारण्यात येतो. यासाठी १८ ते ५० वयोगटातील एक लाख वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या अर्जदारांची निवड करण्यात येते.

### थेट कर्ज योजना

महामंडळाकडून व्यवसायानुसार एक लक्ष रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येते. यासाठी अर्जदाराचा सिबिल क्रेडीट स्कोअर किमान ५०० व वार्षिक उत्पन्न मर्यादा एक लाख पर्यंत असावी. नियमित ४८ मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करणा?या लाभार्थींना व्याज अदा करावे लागणार नाही.

### वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना

गरजू व कुशल व्यक्तींना व्यवसायाकरिता बँकेमार्फत १० लाखापर्यंत वैयक्तिक कर्ज देण्यात येते. कर्जाचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत) अनुदान स्वरुपात लाभार्थीच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. यासाठी कुटुंबाचे मागील आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न मर्यादा रु. ८ लाख राहील. उमेदवाराने शासनाच्या https://msobcfdc.in/#/EProfile या अधिकृत वेबपोर्टलवर नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जाकरिता पासपोर्ट फोटो, पॅनकार्ड, आधारकार्ड, रेशनकार्ड, उत्पन्नाचा, जातीचा, रहिवासीचा दाखला आदी कागदपत्र आवश्यक आहेत.

### कर्ज व्याज परतावा योजना

बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत) अशा शासन प्रमाणीकरण प्राप्त संस्थांना बँकेतर्फे स्वयंरोजगार, उद्योग उभारणीकरिता जे कर्ज दिले जाईल त्यावरील व्याज परतावा महामंडळाकडून अदा केला जातो. गटाने विहित वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास जास्तीत जास्त १२ टक्के व्याजदराच्या आणि रु. १५ लक्ष मर्यादेत एकूण व्याजाची रक्कम त्यांच्या खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. गटातील लाभार्थीचे किमान वय १८ ते ४५ वर्षे असावे.

### महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना

राज्यातील ? महिला बचत गटाच्या वस्तुंचे उत्पादन व प्राक्रिया यांवर आधारीत उद्योगांकरिता बँकेमार्फत मंजुर रु.१० लाखापर्यंतच्या कर्जावरील १२ टक्के व्याजाचा परतावा देण्यात येईल. सदर योजना महिला आथीक विकास महामंडळाच्या लोकसंचालीत साधन केंद्र (CMRC) च्या सहाय्याने राबविण्यात येणार आहे.

### कौशल्य विकास? प्रशिक्षण योजना

इतर मागासवर्गातील पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणाद्वारे कौशल्यपूर्ण बनविणे व त्याद्वारे त्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी महामंडळाची ही योजना आहे. संपूर्ण प्रशिक्षण महामंडळाद्वारे करुन देण्यात येते. या योजनेकरीता अर्जदार १८ ते ५० वयोगटातील, इयत्ता दहावी उत्तीर्ण असावा. महामंडळाच्या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

### शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना

उच्च शिक्षणासाठी राज्य, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरीता बँकेमार्फत उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक कर्ज रकमेवरील व्याजाचा परतावा करण्यात येतो. देशांतर्गत अभ्यासक्रमाकरीता रु. १० लक्ष व परदेशी अभ्यासक्रमाकरीता रु. २० लक्ष पर्यत कर्ज देण्यात येते. राज्य व देशांतर्गत अभ्यासक्रमाकरीता दिलेल्या कर्जामध्ये शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहीत्य खरेदी व अर्जदाराचा राहण्याचा व भोजनाचा खर्च याचा समावेश राहील. परदेशी अभ्यासक्रमांतर्गत शैक्षणिक कर्जावरील व्याजाची मागणी करतांना क्वक्वेरेली सायमंड्स (Quacquarelli Symonds) गुणवत्ता निकषांनुसार २०० पेक्षा आतील रँकींग असलेल्या शैक्षणिक संस्थेत प्रवेशाचे तसेच Graduate Record Exam (GRE), Test of English as a Foreign Language (TOEFL) ही पात्रता परिक्षा उत्तीर्ण कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी www.mSobcfdc.org या संकेतस्थळावर तसेच सामाजिक न्याय भवन येथील महामंडळाच्या कार्यालयात जिल्हा व्यवस्थापक विशाखा फडणवीस यांचेशी ९६८९१७८७७३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# व्हिडीओ निर्मिती स्पर्धेकडे शिक्षकांनी फिरविली पाठ

**सालेकसा:** शिक्षण विभागाच्यावतीने शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांना अध्यापन करतानाचा शैक्षणिक व्हिडीओ यार करण्याची स्पर्धा सुरु केली आहे. ही स्पर्धा राज्यस्तरीय आणि तालुकास्तरीय आहे. अनेक ठिकाणी या स्पर्धेला शिक्षकांना भरपूर प्रतिसाद मिळत असला तरी गोंदिया जिल्ह्यात काही तालुक्यांमध्ये या व्हिडीओ निर्मिती स्पर्धेकडे शिक्षकांनी पाठ फिरविल्याचे चित्र आहे.



ऑनलाईन शिक्षणाचे महत्व वाढत चालले आहे. शाळेत प्रत्यक्ष वर्गात शिकवणाऱ्या शिक्षकापेक्षा ऑनलाईन पद्धतीने होत असलेल्या अध्यापन वर्गाकडे विद्यार्थ्यांचा कल जास्त वाढत चालला आहे. अशात शिक्षकांनी सुद्धा काळानुसार आपल्यामध्ये बदल करुन विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार अध्यापनामध्ये आधुनिक बदल करणे आवश्यक आहे. शासनाने ही बाब लक्षात घेता शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण व्हावी म्हणून साहित्य निर्मिती चळवळ उभी राहावी. यासाठी राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनातील शाळांमध्ये पहिले ते बारावीपर्यंत शिकवित असलेल्या शिक्षकांनी शिक्षक प्रशिक्षक स्तरावरील शिक्षक आणि मुख्याध्यापकांसाठी शैक्षणिक व्हिडीओ निर्मितीची स्पर्धा सुरू केली आहे. ही स्पर्धा प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी असून उत्कृष्ट व्हिडीओ निर्मिती करणाऱ्या शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल असे नियोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा तालुका स्तरावर जिल्हा स्तरावर आणि राज्यस्तरावर राबविली जात असून राज्यस्तरावर प्रथम पारितोषीक ५० हजार, द्वितीय ४० हजार आणि तृतीय ३० हजार रुपये ठेवण्यात आले आहेत.

जिल्हास्तरावर प्रथम पुरस्कार दहा हजार, द्वितीय नऊ आणि तृतीय पुरस्कार ८ हजार रुपये असे ठेवण्यात आले आहे. ही स्पर्धा १५ ऑक्टोबरपर्यंत ठेवण्यात आली असून अनेक भागांमध्ये स्पर्धेला या उतस्फूर्त प्रतिसाद मिळत असला तरी गोंदिया जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये शिक्षकांनी याकडे सपशेल पाठ फिकविलेली आहे.

### जिल्ह्यात तालुकानिहाय एकूण व्हिडीओ अपलोड

| तालुका | व्हिडीओ |
|---|---|
| अर्जुनी मोरगाव | ३५ |
| आमगाव | ४१ |
| देवरी | ४८ |
| गोंदिया | ५१ |
| गोरेगाव | ३८ |
| सालेकसा | १७ |
| सडक अर्जुनी | ६४ |
| तिरोडा | १४ |
| एकूण | ३९६ |

### सर्वात मागे तिरोडा तालुका

**जिल्ह्यात सर्वात कमी तिरोडा तालुक्यात फक्त १४ व्हिडीओ अपलोड केंला असून सर्वात जास्त सडक अर्जुनी तालुक्यात ६४ शिक्षकांनी आपला शैक्षणिक व्हिडीओ दिलेल्या लिंकवर अपलोड केलेला आहे. सालेकसा तालुक्यात ५७७ शिक्षकांपैकी केवळ १७ शिक्षकांनीच आपला शैक्षणिक व्हिडीओ अपलोड केलेला आहे.**

### तीन टक्केच शिक्षकांचा प्रतिसाद

**सालेकसा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ११० प्राथमिक शाळा असून २६१ शिक्षक कार्यरत आहेत. जिल्ह परिषदेचे दोन हायस्कूल असून बारा शिक्षक कार्यरत आहेत. दोन आश्रमशाळा असून १८ शिक्षक कार्यरत आहेत. २९ खाजगी शाळा असून २३९ शिक्षक कार्यरत आहेत. कॉन्व्हेंट शाळा सहा असून त्यात १७ शिक्षक कार्यरत आहेत असे १४९ शाळांमध्ये ५५७ शिक्षक कार्यरत असले तरी फक्त १७ शिक्षकांनी म्हणजे तीन टक्के शिक्षकांनी शैक्षणिक व्हिडीओ अपलोड केला आहे.**

# जाचक अटींमुळे संस्था धान खरेदीस मुकणार

**अर्जुनी मोरगाव:** गोंदिया येथील जिल्हा पणन अधिकारी यांच्या जाचक अटीमुळे धान खरेदी योजना वांध्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ब वर्ग दर्जा प्राप्त सभासद संस्थेस किमान एक कोटी रुपये पणन महासंघाकडे जमा करणे बंधनकारक केल्याने अडचण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अटी शिथील करण्याची मागणी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे.



**धान खरेदी करणाऱ्या संस्था या ब वर्ग सभासद दर्जा प्राप्त असले पाहिजे व किमान एक कोटी रुपये बँक गॅरटी स्वरूपात जमा करणे संस्थांना बंधनकारक केल्यामुळे धान खरेदी केंद्र घेण्यात बाधा निर्माण होऊ शकते. यामुळे शेतकरी अडचणीत येतील धान विक्रीसाठी त्यांना अधिक कष्ट घ्यावे लागतील. संस्थांच्या दृष्टीने या अटी जाचा आहेत. सुधारित निकष करावेत जेणेकरुन शेतकऱ्यांना धान विक्रीसाठी वणवण करावी लागणार नाही.**

**गंगाधर परशुरामकर, अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, गोंदिया**

खरीप हंगाम किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत गोंदियाचे जिल्हा पणन अधिकारी व्ही.एस. इंगळे यांनी शुक्रवारी (१३) धान खरेदीसाठी संस्थांना सुधारित निकष ठरवून दिले आहेत. यात अनेक जाचक अटी असल्याने धान खरेदीसाठी संस्था पुढे येतील अथवा नाही याविषयी संभ्रम



निर्माण झाला आहे. मागील तीन आर्थिक वर्षात लेखापरीक्षणात ब वर्ग दर्जा प्राप्त सभासद संस्था असणे बंधनकारक आहे. किमान एक कोटी रुपये बँक गॅरटी, एफडीआर, टीडीआरच्या स्वरूपात पणन महासंघाकडे जमा करणे बंधनकारक असेल. प्रतिखरेदी केंद्राकरिता २० लक्ष रूपये अनामत रक्कम रोखीने भरावे लागेल. यावर व्याज देय राहणार नाही. अशा अटी व शर्ती घालून दिलेल्या असल्याने संस्थांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. यामुळे धान खरेदी करणाऱ्या संस्थांची संख्या कमी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. असे झाल्यास शेतकऱ्यांची कोंडी होण्याची भीती आहे.

# रेल्वे उड्डाण पुलाचे काम रखडले; निविदा प्रक्रिया पूर्ण

**गोंदिया :** गोंदियाचा रेल्वे उड्डाण पूल दीड वर्षांढपूर्वीच पाडण्यात आला. नवीन उड्डाण पुलाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी शासनाच्याच दफ्तर दिरंगाईमुळे गोंदियाच्या रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम शासकीय कार्यालयात अडकून पडले आहे. त्यामुळे गोंदियातील रहिवासी एकाच उड्डाण पुलावरून धोकादायक प्रवास करत असल्याने प्रवाशांचीही मोठी समस्या बनली आहे.



गोंदिया–कोहमारा आणि बालाघाट या जिल्हा मुख्यालयाला जोडणारा रेल्वे पूल ब्रिटिशांच्या काळात बांधण्यात आला होता. तो बराच जीर्ण झाला होता, तरीही या जीर्ण पुलावरुन वाहतूक सुरू होती. सुरक्षेच्या दृष्टीने तत्कालीन जिल्हादंडाधिकारी नयना गुंडे यांनी २ मे २०२२ रोजी या पुलावरुन वाहतूक बंद करण्याचे आदेश दिले होते. सूचनांनुसार जून–जुलै २०२२ मध्ये पूल पाडण्यात आला. या वेळी पूल पाडल्यानंतर तातडीने नवीन पूल बांधला जाईल, असे वाटत होते मात्र तसे होऊ शकले नाही.

सार्वजनिक बांधकाम विभाग गोंदिया यांच्यामार्फत नवीन उड्डाण पुलाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. या पुलासाठी शासनाने ४७ कोटी ६८ लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचे सांगण्यात आले. निविदा प्रक्रिया पूर्ण होताच सप्टेंबर महिन्यापासून नवीन उड्डाण पुलाचे काम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती यापूर्वी देण्यात आली होती, मात्र नवीन उड्डाण पुलाची प्रक्रिया शासकीय कार्यालयातच अडकून पडली आहे.

शहरातील एकमेव उड्डाण पुलावरून वाहतूक केली जात आहे. मात्र या पुलाच्या अरुंदपणामुळे दर दहा मिनिटांनी वाहतूक कोंडी होते. वाढत्या रहदारीमुळे या उडत्या पुलावर अनेक अपघात झाले आहेत.

अवघ्या दोन महिन्यांपूर्वी एका तरुणाचा रस्ता अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. हा पूल केवळ शहरवासीयांसाठीच नव्हे तर या उडण पुलावरून प्रवास करणाऱ्यांसाठीही धोक्यापेक्षा कमी नाही.

४७.६८ कोटी रुपये खर्चून ५५३ मीटरचा उड्डाण पूल बांधण्यात येणार आहे. या संदर्भात या नवीन रेल्वे उड्डाण पुलासाठी शासनाकडून ४७.६८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली. या निधीतून ५५३ मीटर लांबीचा नवीन रेल्वे उड्डाण पूल बांधण्यात येणार आहे. मात्र निधी मंजूर होऊन दीड वर्ष उलटून गेले तरी बांधकामाला अद्याप गती मिळालेली नाही.

### निविदा प्रक्रिया पूर्ण

या उड्डाण पुलाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पहिल्या टप्प्यात १५ कोटींहून अधिक निधीतून बांधण्यात येणा?या उड्डाण पुलासाठी शासनाच्या संबंधित मंत्रालय स्तरावरून कार्यादेश मंजूर करण्यात आला आहे. शासनस्तरावरील प्रक्रिया पूर्ण होताच बांधकामाला सुरुवात करण्यात येणार आहे.
**- नरेश लभाणे,** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया

# जहाल नक्षलवाद्याला अटक, गडचिरोली पोलिसांची मध्यरात्री कारवाई



**गडचिरोली :** कांकेर–गडचिरोली सीमाभागातील पोलीस ठाण्यावर पाळत ठेऊन मोठा घातपात घडविण्याच्या तयारीत असलेल्या जहाल नक्षलवाद्याला अटक करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले. चैनुराम उर्फ सुक्कु वत्ते कोरसा ( ४८, रा. टेकामेट्टा छत्तीसगड) असे अटक करण्यात आलेल्या नक्षलवाद्याचे नाव असून त्याच्यावर १६ लाखांचे बक्षीस होते. शुक्रवारी मध्यरात्री गोपनीय माहितीच्या आधारे गडचिरोली पोलिसांच्या नक्षलविरोधी विशेष पथकाने ही धाडसी कारवाई केली.

शुक्रवारी पोलिसांना छत्तीसगड सीमेवरील जारावंडी–सोहगाव जंगल परिसरात संशयास्पद व्यक्ती पाळत ठेऊन असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. यावरुन पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी तात्काळ पोलिसांच्या नक्षलविरोधी विशेष पथकाला त्याभागात पाठवून अभियान राबविले. दरम्यान, जारावंडी ते सोहगाव मार्गावरील कुरमावडा फाट्याजवळ चैनुराम हा संशयास्पद स्थितीत आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, तो जारावंडी व पेंढरी पोलीस पथकावर पाळत ठेऊन काही दिवसात मोठा घातपात घडवून आणण्याचा तयारीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. यावरुन पोलिसांनी त्याला अटक केली.

चैनुराम हा २६ जून २००० मध्ये नक्षलवाद्यांच्या पर्लकोटा दलममध्ये भरती झाला. २००३ मध्ये त्याच्यावर नक्षल्यांच्या विभागीय समितीच्या सहायक सदस्य पदाची जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर २००३ ते २०१४ पर्यंत तो नक्षल्यांच्या नंदनवन समजल्या जाणाऱ्या "माड' विभागाच्या समितीत सदस्य म्हणून कार्यरत होता. काही दिवस त्याला सहायक सदस्य पदाची जबाबदारी दिल्यानंतर २०१६ पुन्हा त्याला साहित्य पुरवठा विभागाच्या समितीत उप–कमांडर पदावर बढती देण्यात आली. तेव्हापासून तो सीमाभागात कार्यरत होता. त्याच्यावर सात चकमकी व २०१० मध्ये नारायणपूर येथे एका व्यक्तीच्या खुनात सहभागी असल्याचा आरोप आहे. महाराष्ट्र शासनाने त्याच्यावर एकूण १६ लाखांचे बक्षीस ठेवले होते. अशी माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी पत्रपरिषदेत दिली. यावेळी अपर पोलीस अधीक्षक अनुज तारे, यतीश देशमुख, कुमार चिंता उपस्थित होते.

# पवार महिला समितीच्या अध्यक्षपदी सौ.धनिषा कटरे तर सचिव पदी सौ.आरती पारधी यांची निवड



**गोंदिया:**–पवार प्रगतिशील मंचच्या तत्वावधानामध्ये २०२३–२४ करीता विविध कार्यक्रमाच्या आयोजन राबविण्याकरीता पवार महिला समितीचे गठन करण्यात आले. ज्यामध्ये महिला समिती अध्यक्षपदी सौ.धनिषा संजय कटरे तर सचिव पदी सौ.आरती पारधी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

तसेच समितीच्या उपाध्यक्षपदी स्वाती बिसेन व दयावंती येळे, सहसचिव पदी– दीप्ती पटले, कोषाधक्ष – आरती चौधरी, संघटन सचिव– शेफाली बिसेन, प्रचार सचिव– मोरेश्वरी बिसेन तर सदस्य पदी– प्रीती बघेले, मिना टेंभरे, सुनीता ठाकूर, रीमा ठाकरे,एकता येडे, दुर्गेश्वरी पटले, कुंतन पटले, इंदू टेंभरे, विद्या ठाकूर, दुर्गा ठाकरे, वंदना बिसेन, लक्ष्मी ठाकूर, पूजा टेंभरे, एडवोकेट–राजकुमारी कटरे, डॉ.वृषाली चौधरी, माया पटले यांची निवड करण्यात आली.पवार प्रगतीशील मंचचे पदाधिकारी अध्यक्ष एड. पृथ्वीराज चव्हाण, सचिव सौ.प्रीती देशमुख (गौतम), पन्नालाल ठाकरे, बंटी बोपचे, अजय रहांगडाले, पंकज पटले, छत्रपाल चौधरी, दिलिप पारधी, संजू ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये महिला समितीची निवड करण्यात आली.

# तालुका व्यापारी संघटनेच्या अध्यक्षपदी सोनवाने तर सचिव मनिष जैन



**गोरेगाव :–** गोरेगाव तालुक्यातील व्यापाऱ्यांच्या समस्या व अडी–अडचणी मार्गी लावण्यासाठी एकसंघ होवून पुढाकार घेता यावे, या अनुसंगाने तालुका व्यापारी संघटना स्थापित करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान कृषी उत्पन्न बाजार समिती येथे व्यापाऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत तालुका व्यापारी संघटनेची कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी इसुलाल सोनवाने, उपाध्यक्ष जयमलसिंग सग्गु तर सचिव पदी मनिष जैन यांची तसेच सर्व पदाधिकाऱ्यांची सर्वसमंतीने निवड करण्यात आली.

तालुका व्यापारी संघटना स्थापित करण्याच्या उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समिती येथे व्यापाऱ्यांची सभा घेण्यात आली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी इसुलाल सोनवाने हे होते. तर अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार, सुरेंद्र पटले, तपेश टेंभरे, मुन्ना लिल्हारे, महेश बारेवार आदि उपस्थित होते. दरम्यान कार्यकारिणी गठीत करण्याच्या अनुसंगाने चर्चा करण्यात आली. याप्रसंगी सर्वसंमतीने पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

यात अध्यक्षपदी इसुलाल सोनवाने, उपाध्यक्ष जयमलसिंग सग्गु, सचिव मनिष जैन, सहसचिव रूपेश रहांगडाले, कोषाध्यक्ष महेंद्र अग्रवाल तर कार्यकारिणी सदस्य म्हणून मार्वफ्डराव वैद्य, रामभाऊ अगडे, मनोहर रामटेके, तुषित पटले, संतोष रहांगडाले, अनिल मानकर, दिनेंद्र येडे, धनराज येरपुडे, मंगेश पटले, विक्की हरीणखेडे, योगेश बारेवार, जितू बिसेन यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीचे संचालन मनिष जैन यांनी केले. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी प्रशांत पटले, प्रमोद मेश्राम, सतिश चौबे, फत्तेसिंग सग्गु, विकास साखरे, शिवा चन्ने यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा उद्योग केंद्राने व्यवसाय उभारण्यास सहकार्य करावे-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

**गोंदिया :–** व्यावसायीक व उद्योगाशी संबंधित लाभार्थ्यांना जिल्हा उद्योग केंद्राने व्यवसाय उभारण्यास सहकार्य करावे, जेणेकरुन गोंदिया जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात हातभार लागेल असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले. एमएसएमई क्षेत्रासंदर्भात राज्य आणि केंद्र शासनाची धोरणे व उपक्रम याबाबत जागरुकता वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथील नियोजन समिती सभागृहात कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यशाळेत १७५ हुन अधिक उद्योजक, व्यावसायीक क्लस्टरचे सभासद व महिला बचत गटाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले.

ज्याप्रमाणे कार्यशाळेचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे, व्यावसायीक व उद्योगाशी संबंधित लाभार्थ्यांना जिल्हा उद्योग केंद्राने व्यवसाय उभारण्यास सहकार्य करावे असे आवाहन केले. जेणेकरुन गोंदिया जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात हातभार लागेल असे ते म्हणाले. उद्योग संचालनालयातील मैत्री कक्षाचे नोडल आॅफिसर म्हणून उद्योग अधिकारी एम.एल.साळवी हे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यशाळेत केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध विभागाच्या वरिष्ठ अधिकायांनी मार्गदर्शन केले. विवेक निर्माणश्वर मार्केटिंग एक्झिक्यूटिव्ह यांनी आयडीबीआय कॅपीटल बद्दल मार्गदर्शन केले. विनय अहिरवार प्रबंधक सिडबी यांनी सिडबीच्या योजना व सीजीटीएमएस योजनेवर विस्तृत मार्गदर्शन केले. मनिष तिवारी क्वालिटी कंट्रोल इंडियाचे कन्सल्टंट यांनी झेड सर्टिफिकेशन बद्दल उपस्थितांना माहीती दिली. ओएनडीसीचे अधिकारी धिरज कुमार यांनी त्यांच्या योजनांची माहिती दिली. डिजीएफटीच्या अधिकाऱ्यांनी निर्यात संबंधाने माहिती दिली. पोस्टाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाच्या उद्योग संबंधाने योजना सादर केल्या.

गजानन अग्रवाल लाख उद्योजक व निर्यातक यांनी निर्यात करतांना आलेले आपले अनुभव कथन केले. हुकुमचंद अग्रवाल अध्यक्ष एमआयडीसी असोशिएसन यांनी जिल्ह्याच्या औद्योगिक विकासावर उहापोह केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भुनेश्वर शिवनकर, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र गोंदिया यांनी केले. उपस्थितांचे आभार संगिता ढोणे प्रकल्प अधिकारी एमसीईडी गोंदिया यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले.

# ऑनलाइन क्रिकेट जुगारावर कारवाई, तीन बुकींवर गुन्हा दाखल

**गोंदिया :** शहरातील सर्वात मोठा बुकी सोंटू ( अनंत) जैन याच्यावर कारवाई होत असतानाही गोंदिया शहरात ऑनलाईन क्रिकेट सट्टा थांबलेला नाही. गोंदिया जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी दिनेश लबदे व त्यांच्या पथकाने शनिवारी १४ ऑक्टोबर रोजी भारत–पाकिस्तान विश्वचषक साखडी सामन्यादरम्यान सिंधी कॉलोनी संकुलात सुरू असलेल्या ऑनलाइन क्रिकेट बेटिंग बूथवर छापा टाकला.

धर्मेंद्र सुरेश ठकरानी या सह तीन क्रिकेट बुकींना अटक करण्यात आली. खानचंद संगतानी (वय ४१ वर्षे), भरत भोजवानी (४७ वर्षे) यांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे ३ मोबाईल जप्त करण्यात आले आहे . त्यांच्या विरुद्ध गोंदिया शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभ अप या महादेव अपच्या शाखेतून फलंदाजी होत होती.

ऑनलाइन सट्टेबाजीसाठी बहुचर्चित महादेव अपवर देशव्यापी कारवाई होत असतानाही महादेव अपद्वारे ऑनलाइन क्रिकेट बेटिंग आणि इतर ऑनलाइन सट्टेबाजी अद्याप थांबलेली नाही आणि त्याच्या पर्यायाने महादेव अप च्या विविध शाखा सक्रिय करून ऑनलाइन सट्टेबाजी केली जात आहे. शनीवारी करण्यात आलेल्या या कारवाईत महादेव अपच्या शाखा शुभ अपच्या माध्यमातून ऑनलाइन सट्टेबाजी केली जात होती. अशी माहिती ताब्यात घेण्यात आलेल्या बुकींनी पोलिसांना दिली.

# प्रभारी गटविकास अधिकारी खोटेलेंचा कार्यभार तात्काळ काढा

**सडक अर्जुनी:** – येथील पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि यशवंत गणविर यांना निवेदन देऊन प्रभारी गटविकास अधिकारी डी.एम.खोटले यांचा प्रभार तात्काळ काढण्याची निवेदनाद्वारे केली.

पंचायत समिती सडक अर्जुनी येथील गटविकास अधिकाऱ्यांचा कार्यभार सांभाळत असलेले प्रभारी गटविकास अधिकारी डी.एम .खोटेले हे मनमजी कारभार करत असल्याने पंचायत समितीचे पदाधिकारी त्रस्त आहेत जर का पदाधिकारी गटविकास अधिकाऱ्यांमुळे त्रस्त असतील तर सामान्य जनतेला किती त्रास सहन करावा लागत असेल. त्यामुळे जनतेला होणारा त्रास व सदर अधिकाऱ्याची हेंडसाळ वागणुक यामुळे त्यांचा तात्काळ पदभार काढण्याची मागणी या निवेदनातुन केली.

जिल्हा स्तरावरून येणाऱ्या विविध योजनांची माहिती, पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम, कोणत्याही कामाला मासिक सभेत न घेता ठराव पारित करणे, पंचायत समिती पदाधिकाऱ्यांशी असभ्य वर्तन करणे,अश्या विविध तक्रारीसह प्रभार काढण्याची मागणी केली.

यावेळी पंचायत समिती सभापती संगीता खोब्रागडे, उपसभापती शालिंधर कापगते, सदस्य चेतन वळगाये, शिवाजी गहाणे, डॉ.रुकिराम वाढई, अल्लाउद्दीन राजानी,निशा काशीवार, वर्षा शहारे, दिपाली मेश्राम,सपना नाईक उपस्थित होते.



# अंकीताच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या-ओबीसी अधिकार मंचचे निवेदन




**गोंदिया:–** वर्धा जिल्ह्यातील देहगाव गोसावी जवळीस तुळजापूर रेल्वेस्टेशन परिसरातील ओबीसी समाजातील कु.अंकीता सतीश बाईलबोडे या मुलीचा राहत्या घरी निर्घृण खून करणाऱ्या आरोपींवर जलदगती न्यायालयात खटला सुरु करुन फाशीची शिक्षा देण्यात यावे अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसिलदार समशेर पठाण यांच्या मार्फत पाठविण्यात आलेल्या निवेदनातून ओबीसी अधिकार मंचने केली आहे.

निवेदनात ओबीसी प्रवर्गातील मुलीचा निर्घृण खून करणारे चारही आरोपी जरी आज पोलीस कोठडीत असले तरी निर्ढावलेल्या मारेकऱ्यांना कश्याचाही धाक ना कायद्याची भीती राहिली नाही. अश्या मारेकऱ्यांवर जलदगती न्यायालयात खटला चालवून लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदन देतेवेळी खेमेंद्र कटरे, अशोक पडोळे, कैलास भेलावे, सुनिल लांजेवार, प्रेम साठवणे, दिनेश गायधने, सुनिल भोगांळे, पुरणलाल पाथोडे आदी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्ती धोके निवारण दिन साजरा

## आपत्ती धोके निवारण दिनी NDRF पुणे, व अग्निशमन विभाग गोंदियाकडून प्रात्यक्षिक व रंगीत तालीम कार्यक्रमाचे आयोजन






**गोंदिया:–** जागतिक आपत्ती धोके निवारण दिनानिमित्त १३ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्ती धोके निवारण संदर्भातील प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी अपर जिल्हाधिकारी प्रकाश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, अधीक्षक उद्धव नाईक, ना. तह. संजय धार्मिक, पोरचेट्टीवार, बिटले व उपस्थित अधिकारी–कर्मचाऱ्यांनी प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन केले.

आपत्ती धोके कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने दि.१३ ऑक्टोबर हा दिवस आपत्ती धोके निवारण दिवस म्हणून घोषित केला आहे. त्यानुसार राज्यातही दि.१३ ऑक्टोबर हा दिवस आपत्ती धोके निवारण दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

त्यानुषंगाने आपत्ती प्रवण भागात जीवित, वित्त व पर्यावरणविषयक हानी होऊ नये, म्हणून कटिबद्ध राहण्यासाठी "मी –––– प्रतिज्ञा करतो/करते की, शासनाच्या आपत्ती सौम्यीकरण्याच्या विविध उपक्रमात मी सक्रिय सहभाग नोंदवून, आपत्तीपासून माझी, माझ्या परिवाराची, माझ्या समाजाची व सार्वजनिक मालमत्तेची सुरक्षा करण्याविषयी ज्ञान प्राप्त करीन, आपत्तीचे धोके कमी करणाऱ्या समुदाय आधारित उपक्रमामध्ये मी सक्रिय सहभाग घेईन, माझ्या परिवारात व समाजात आपत्तीबद्दल जनजागृती करुन त्यासंबंधी पूर्वतयारी कशी करावी, याविषयी सदैव प्रयत्न करीन, राज्यातील आपत्तीप्रवण भागात, जीवित वित्त व पर्यावरणविषयक हानी होऊ नये म्हणून, मी सदैव कटिबध्द राहीन", अशी प्रतिज्ञा जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात घेण्यात आली.

### जागतिक आपत्ती धोके निवारण दिनानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम

**आपत्ती निवारण दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), पुणेकडून न.मा.द. महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांनी आपत्ती निवारण करण्यासाठी प्रतिज्ञा घेतली. तसेच NDRF, पुणेचे पो.नि. मुकेश कुमार बाजिया यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले व आपत्ती पासून सुरक्षा व बचाव या अनुषंगाने माहिती दिली. यावेळेस न.मा.द. महाविद्यालयाची प्राचार्य श्रद्धा महाजन, प्रो.सौ. जैन, अपर तहसीलदार विशाल सोनवाने शोध व बचाव दलाचे प्रमुख नरेश उईके प्रामुख्याने उपस्थित होते. यानंतर जिल्हा क्रीडा संकुल, गोंदिया येथे महसूल, पोलीस, नगरपरिषद व आरोग्य विभागाची रंगीत तालीम ठेवण्यात आली होती. सदर रंगीत तालीम कार्यक्रमात पूर परिस्थितीमध्ये सुरक्षा व बचाव या विषयावर स्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.**

### अग्निशमन विभागाकडून अग्नी सुरक्षा व बचाव या विषयावर प्रात्यक्षिक

**आपत्ती निवारण दिनानिमित्त अग्निशमन विभाग गोंदियाकडून सहा. अग्निशमन अधिकारी यांनी सुरक्षा व बचाव या विषयावर आदर्श कॉन्व्हेंट येथील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळेस अग्निशमन अधिकारी नीरज काळे, आदर्श कॉन्व्हेंट येथील शिक्षिका श्रीमती रंगारी रोडे, श्री लांजेवार, भावे, अंबेडारे तथा अग्निशमन विभागाचे कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.**

# बोगस बियाणे देऊन शेतकऱ्याची फसवणूक, २ लाखांचे नुकसान

**देवरी:–** तालुक्यात सर्वाधिक धानाची लागवड केली जाते. मात्र, या भाताच्या आगारातही आता बोगस बियाणांचा सुळसुळाट झालाय. तालुक्यातील बोरगाव येथील शेतकऱ्याने सीड्स कंपनीचे शिवाजी तांदळाचे वाण शेतात पेरले. मात्र, शिवाजी वाणाचे भात न येता खबरा धान उगवल्याने कंपनीने शेतकऱ्याची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले आहे. शेतकऱ्याने कंपनीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. तसेच बियाणे कंपनीविरुद्ध न्यायालयात जाण्याचा इशारा शेतकऱ्याने दिला आहे.




देवरी येथील गौरीशंकर दहीकर हे प्रगतिशील शेतकरी असून, दरवषी ते आपल्या बोरगाव (डवकी) येथील शेतीत दोन लक्ष रुपयांचे उत्पन्न घेतात. यावर्षी त्यांनी सीड्स कंपनी तेलंगणाचे शिवाजी नावाचे धान पिकाचे १५० किलो वाण कृषी केंद्रातून खरेदी करुन चार एकर शेतात रोवणी केली. नियमानुसार वेळेवर धानाला खत, पाणी व औषध फवारणी केली. त्यानुसार धानाची माफक वाढ होऊन धानाची चांगली वाढ झाली.

मात्र, जेव्हा धानाच्या लोंबा यायला लागल्या तेव्हा शिवाजी प्रजातीचे धान निघण्याऐवजी खबरा पांढरे लोंब बाहेर आली. हे बघून आजूबाजूचे शेतकरी आश्चर्यचकित झाले. जवळपास ९० टक्के खबरा असल्याने या कंपनीने यात घोळ केला असल्याचा आरोप केला आहे. बोगस बियाणे शेतकऱ्याला पुरवठा केल्याने दहीकर यांचे जवळपास दोन लक्ष रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

**कंपनीकडे केली तक्रार**

दहीकर यांनी याची सदर सीड्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना तक्रार केली असता कंपनीचे अधिकारी बोरगाव येथील शेती पाहायला ९ ऑक्टोबर रोजी आले. त्यांनी पाहणी केली व मान्य सुद्धा केले की खबरा ९० टक्के आहे. त्यांनी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बोलून शेतकऱ्यांचे समाधान करण्यास सांगितले. तीन–चार दिवसांनंतर फोन करून शेतकऱ्याने विचारले असता तुमच्या बियाणांचा खर्च कंपनीकडून भरून देऊ, असे उडवाउडवीचे उत्तर मिळाले.

दहीकर यांनी आपल्या चार एकर शेतात या कंपनीचे बियाणे लावले. मात्र, ते बोगस निघाल्याने आणि ९० टक्के खबरा झाल्याने त्यांचे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले. पण, कंपनी फक्त वीस ते पंचवीस हजार रुपये बियाणांची रक्कम देण्यास तयार आहे. परंतु, दहीकर यांचे दोन लक्ष रुपयांचे नुकसान झाल्याने त्यांनी कृषी विभाग देवरी, पंचायत समिती देवरी तसेच पोलिस स्टेशन देवरी येथे कंपनीविरुद्ध फसवणूक झाल्याची तक्रार दाखल केली आहे. तसेच कंपनीच्या विरोधात ग्राहक न्यायालयात दाद मागणार असल्याचे शेतकरी गौरीशंकर दहीकर यांनी सांगितले.